# बा-बापूंचे अंतिम अपूर्व दर्शन

प्रयोजन

अनुवाद

**ब्रिजमोहन हेडा**

गत पाच वर्षांपासून पू. जवाहरलालजींनी भारत सरकारच्या शिक्षण खात्यातर्फे पू. बापूजींच्या जीवनदर्शनाच्या दृष्टीने व्याख्यान देण्याचा कार्यक्रम मला सोपवला होता. याकरिता मुंबई, दिल्ली, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार आणि राजस्थानमधील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये व्याख्यान द्यायला सांगितले.

या व्याख्यानांच्या निमित्ताने मला विद्यार्थीजगाच्या संपर्कात यायची संधी मिळाली. या दरम्यान प्रत्येक ठिकाणी विद्यार्थांकडून बापू आणि आणि बाच्या अखेरच्या दिवसांचे दर्शन घडवणाऱ्या पुस्तकाची मागणी होऊ लागली. या मागणीचे समाधान करण्याकरिता मी हे आशयघन लहानसे पुस्तक तयार केले आहे. आशा आहे की विद्यार्थीमित्रांचे आणि गांधी साहित्याच्या इतर वाचकांचे यामुळे समाधान होईल.

आकाशवाणीच्या राजकोट केंद्रातर्फे 'बापूंच्या जीवनामधून' या शृंखलेत अनेक व्याख्याने ध्वनिमुद्रित करण्यात आली आहेत. ते प्रसिद्ध करण्याची परवानगी दिल्याबद्दल मी आकाशवाणीचीची ऋणी आहे.

माझ्या व्याख्यानांच्या कार्यक्रमात ज्या ज्या संस्थांमध्ये मला व्याख्यान देण्याची संधी मिळली त्या त्या संस्थांच्या संचालकांची मी आभारी आहे.

मनुबहेन गांधी

१-९-१९६१

# १. पूज्य बापू

हिंदुस्थानचा इतिहास काही आगळावेगळाच आहे. या आर्यावर्ताकडे एक दृष्टिक्षेप टाकला तर आपल्याला अनेक युगकथा मिळतील. परंतु या सर्वांमध्ये बुद्धयुग आणि गांधीयुगाकेडे सामान्याहून सामान्य माणसाची नजरसुद्धा खिळल्याशिवाय राहणार नाही. हे दोन्ही युग असे काही आहेत की यांच्यातून मानवश्रेष्ठतेचे अतुलनीय दर्शन घडते. भगवान बुद्धाची आपल्याला विशेष माहिती नाही. परंतु काहीच वर्षांपूर्वी हिंदुस्थानात जेव्हा बुद्धजयंती साजरी करण्यात येत होती तेव्हा विद्वानांनी शोध घेऊन त्यांच्याशी संबंधित अनेक प्रसंग आपल्यासमोर मांडले. आणि हे युग, महात्मा गांधी युग तर आपण आपल्या नजरेने न्याहाळले आहे. याद्वारे या दोघांची तुलना होऊ शकते.

परंतु माझ्यासारखीला, जिने दोन्ही युगांचे अभ्यासपूर्ण दर्शन घेतले आहे, तिला महात्मा गांधींचे युग अतिशय कठीण वाटते. भगवान बुद्धाचे जीवनचरित्र जेव्हा मी वाचते तेव्हा त्याची कल्पनाच करत राहावी लागते. जेव्हा की पूज्य बापूजींची चाकरी करत असताना त्यांची जी सत्त्वपरीक्षा सुरू होती तिची मी साक्षी होते हे याचे कारण आहे. यामुळेच असे सांगण्याची मी हिंमत करते आहे.

इ. स. १९४२ च्या ९ ऑग्सटच्या दिवशी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यसंघर्षाचे पर्व अपूर्वच गणले जाईल. या ऐतिहासिक दिवशी पुणे येथील आगाखान महालात पू. बापूजी, पूज्य कस्तुरबा तसेच पूज्य महादेवभाईच्या जीवनातील शेवटच्या कारावासाची सुरुवात झाली.

माझे पूर्वजन्मीचे कोणते तरी पुण्यकर्मच असेल की या काळात मला पूज्य कस्तुरबाच्या सेवेकरिता पूज्य बापूजींबरोबर राहण्याची अमूल्य संधी मिळाली. तिथेच पूज्य बापूजींनी पूज्य महादेवकाका तसेच कस्तुरबांना अखेरचा निरोप दिला होता. बापूजींनी हा निरोप किती जड अंतःकरणाने दिला होता याचे दृश्य माझ्या डोळ्यांसमोरून कधीही पुसले जाणार नाही.

आणि अखेरीस बापूजींनी सत्याग्रहाच्या आणि शांततेच्या मार्गाने इंग्रजांना नमवले. त्यांच्या या पन्नास वर्षाच्या यज्ञमय जीवनाशी कोणता भारतीय अनभिज्ञ असेल? परंतु बापूजींनी आपल्या जीवनाच्या शेवटच्या वर्षातील आपल्या महान आणि अलौकिक सेवेवर तर शिक्कामोर्तबच केले होते.

बापूजी आपल्या जीवनात ज्या सिद्धांताचे अनुसरण करत होते त्या त्या सिद्धांताचा ताळेबंदच १९४७च्या ३० जानेवारीपासून तर १९४८ च्या ३० जानेवारी पर्यंतच्या काळात त्यांनी दिला होता आणि शेवटी नफ्यातोट्याचा असा अद्भुत हिशेब दिला की ज्यामुळे आपल्यासारख्या त्यांच्या सर्व वारसदारांचे चेहरे जगात उजळले.

१९४५ च्या अखेरीस नोआखालीत हत्याकांडाचा स्फोट झाला. त्या वेळी पूज्य बापूजी दिल्लीत होते. भावाभावातील भांडण मिटवणे ही काही गंमतीची गोष्ट नसते. आपल्या देशबांधवांच्या हातून आपल्या निर्दोष देशबांधवांचा आणि भगिनींचा सुरू असलेला हा रक्तपात त्यांना बापूजींना सहन होऊ शकला नाही. यामुळे राजधानीचे शहर सोडून त्यांनी एका कोपऱ्यातील लहानशा प्रांतातील लहानशा गावात धाव घेतली. तेथील हृदयद्रावक दृश्य पाहून त्यांचे अंतःकरण रडू लागले. त्यांनी वर्षांपासूनच्या आपल्या सहकाऱ्यांना एकेका गावात ठेवले आणि त्यांनी स्वतः श्रीरामपूर या एका लहानशा गावात राहाण्याचा निर्धार केला. माझी इच्छा असेल तर या अखेरच्या यज्ञात सहभागी होण्याकरिता अशी तार त्यांनी तिथून माझ्या वडिलांना केली आणि मला बोलावले. परंतु त्याचबरोबर त्यांनी तिथे मला कोणत्या हालअपेष्टा सहन कराव्या लागू शकतात याचे भयंकर चित्र चित्रित करत असताना माझ्या वडिलांना लिहिले होते -

> If you and Manu sincerely anxious for her to be with me at your risk you can bring her to be with me.
>
> - Bapu

यावरून तेथील परिस्थितीच्या गांभीर्याची काहीशी कल्पना यावी. गावोगावी पदयात्रा सुरू होणार होती. यामुळे श्री सतीश बाबूंनी बापूजींकरिता ३०० रुपयांची एक फिरती झोपडी तयार केली. परंतु बापूजी ती कशी काय सहन करतील? त्यांना तर लोकांच्या सुखदुःखात भागीदार व्हायचे होते.

जानेवारीची असह्य थंडी आणि त्यातही बंगालमधील झडीमुळे अजूनच दमट झालेले हवामान. नारळ आणि पोफळीच्या वनराईतून सूर्यदेवाचे दर्शनसुद्धा दुर्लभ होत असे. रस्त्यात खूप चिखल असायचा आणि त्यातही धानाच्या पाण्याने भरलेल्या शेतांमधून आम्हांला जावे लागत होते. कुठे कुठे तर दरीवर वेळूचे पूल बांधलेले असायचे. त्यावरून चालत जावे लागत होते. माणसाला जर तोल सांभाळता आला नाही तर खाली दरीतच कोसळायचा. अशा कंटाळवाण्या आणि बिकट मार्गावरून चालावे लागत असतानाही बापूजींनी

चपलांचा त्याग केला होता. अनेकदा पायाच्या अंगठ्यातून रक्ताची धार वाहू लागायची. परंतु त्यांनी त्याची मुळीच पर्वा केली नाही. गुरुदेवांचे 'एकला जाने रे' हे भजन त्यांनी मूर्तीमंत साकार करून दाखवले -

त्यारे कांटा-राने,
तो तारे लोही नीगळते चरणे,
भाई एकलो धाने रे !

या यात्रेत स्थानिक लोकांनी जर आपल्या घरी बापूजींना राहण्याची परवानगी दिली नाही तर बापूजी झाडाखालीसुद्धा मुक्काम करायचे. बकरीचे दूध मिळाले नाही तर नारळाच्या दूधावरच भागवले. अहो, चार पातळ खाकरे तयार करायला कणिक मिळाली नाही तर पोह्यांवरच काम भागवायचे ! 'करायचे वा मरायचे' हाच संकल्प करून त्यांनी स्वतःला सत्य आणि अहिंसेच्या कसोटीवर कसे चढवले होते याची साक्ष आजही त्यांच्या या अंतःकरणातून निघालेल्या उद्गारांवरून दिसून येते -

> हे पत्र सकाळी तीन वाजता लिहवून घेतो आहे. दातणपाणी तर सकाळी चार वाजता होईल. नंतर प्रार्थना. ईश्वर जसे निभवेल तसे निभेल. असे असल्यामुळे मला प्रकृतीची मुळीच काळजी वाटत नाही. शरीर काम करते आहे. अशा प्रकारे माझी परीक्षा सुरू आहे. माझी अहिंसा आणि सत्य यांचे मोजमाप करण्याचा हा काटा आहे. केसाचा शंभरावा भाग केला तरी तो मोजू शकेल असा हा सूक्ष्म वजन मोजणारा काटा आहे. इतके सूक्ष्म मोजमाप करायच्या काट्यावर मी चढलेलो आहे. यात कोणतीही गोष्ट अपूर्ण ठेवता येऊच शकत नाही. परंतु मी यांचा प्रतिनिधी झालेलो असल्यामुळे माझी अपूर्णता सिद्ध व्हायची असेल तर होईल. आणि असे जर सिद्ध होणार असेल तर ईश्वर मला उचलून घेईल आणि इतर कोणत्या तरी देहाद्वारे हे काम करवून घेईल इतकी आशा तर आहेच.
>
> मला खेद होतो की जे काम प्यारेलाल करत होता ते मी करू शकत नाही. माझ्याजवळ जे दोन लोक आहेत त्यांच्याकडूनही हे काम होऊ शकलेले नाही. परंतु दोघेही कुशाग्र आहेत. यामुळे मी आशा करतो की ते हे काम पूर्ण करून टाकतील. अशात तुझे पत्र उत्तेजन देणारे आहे. तीनचार दिवसांपूर्वी चि. जयसुखलाल चि. मनूच्या इच्छेप्रमाणे तिला इथे सोडून गेला आहे. परंतु माझ्याबरोबर राहून मरायची तयारी ठेवण्याच्या अटीवर मी तिला इथे येऊ दिले आहे आणि पडल्या पडल्या डोळे मिटून तिच्याकडून मी हे लिहवून घेतो आहे. यामुळे मला कोणताही त्रास होणार नाही. याच कोठडीत

सुचेता (सुचेता कृपलानी) पडलेली आहे. तिला झोप लागलेली आहे माझ्या फळीवर पडून हळू आवाजात सांगून मनूकडून मी हे लिहवून घेतो आहे. इथे अतिशयोक्तीला सीमा नाही. लोक जाणूनबुजून अतिशयोक्ती करतात असे म्हणता येऊ शकत नाही. अतिशयोक्ती कशाला म्हणतात हेच त्यांना माहीत नाही. ज्याप्रमाणे इथे हिरवेगार गवत उगवत असते त्याचप्रमाणे त्यांची कल्पनाशक्ती उडत असते. चोहोकडे नारळपोफळीची झाडे आहेत, आणि यांच्या छायेत भाजीपाला उगवत असतो. सर्व नद्या सिंधू सारख्या. गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा या तर त्यांचे पाणी बंगालच्या उपसागरात नेऊन ओतत असतात.

येथील प्रकरण कठीण आहे. सत्य मुळापासूनच नाही. अहिंसेच्या नावाने हिंसा होत असते. धर्माच्या नावाने अधर्माचरण होत असते. सत्य-अहिंसेची परीक्षा अशाच वातावरणात होईल ना? हे मला कळतेही आणि माहीतही आहे. यामुळे इथे पडलो आहे. इथून मला बोलावू नका. घाबरटपणाने पळून आलो तर माझे नशीब. हिंदुस्थानात अजूनही अशी लक्षणे दिसत नाहीत. म्हणूनच इथे करायचे किंवा मरायचे आहे. मी अग्निकुंडात पडलो आहे. यामुळे इथे काय चालले आहे आणि काय सत्य आहे, याचा पुरावा मी नीटपणे देऊ शकतो.

अजून एका सहकाऱ्याला याच वेळी लिहिले -

मी जर अधर्माचरण केले तर मला विरोध करणे सर्व मित्रांचा धर्म होतो. सत्याग्रही अखेरीस दुराग्रही होतो. अंतर इतकेच आहे की माणूस जेव्हा असत्याला सत्य समजतो तेव्हा तो दुराग्रही होतो. मी असा तर नाही? परंतु यामुळे काय होते? मी ईश्वर तर नाही? चूक करू शकतो ! चुका केल्या आहेत. एखाद वेळी फार मोठी चूक होऊ शकते. जर तसे असेल तर जितके माझे हितेच्छू आहेत त्या सर्वांनी मला विरोध करून माझे डोळे उघडले पाहिजे. त्यांनी जर असे केले नाही तर मला असेच जावे लागेल, चालला जाईन. इथे मी जे काही करतो आहे तो सर्व माझ्या यज्ञाचाच भाग आहे. जाणूनबुजून मी असे काहीही करून राहिलेलो नाही की ज्याचा यज्ञात समावेश होऊ शकणार नाही. आराम करतो तोसुद्धा यज्ञाकरिताच. या वेळी डोळे मिटलेले आहेत, पोटावर माती आहे. आणि मनूकडून लिहवून घेतो आहे. मनूला यज्ञामुळेच ठेवले आहे. . . .

हा तर त्यावेळी त्यांचे जे हृदयमंथन सुरू होते त्याचा एक कवडसा आहे.

अशा प्रकारे जवळपास दोन महिने अडीअडचणी सहन करता करता यात्रा सुरू राहिली. रामावतारात श्रीरामचंद्रजींच्या वनवासाच्या वेळी तुलसीदासजी दो दोहा म्हणाले होते -

दंडक वन प्रभु पावन किनो,
ऋषियन त्रास मिटाई . . .

तसेच या गांधीयुगात गांधीजींनी हे दंडकवन बेहाल झालेल्या गरीब आणि हालअपेष्टा सहन कराव्या लागणाऱ्या लोकांना त्रासमुक्त केले.

मुसलमान बांधवांनी मंदिराची मशीद केली होती. त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आणि शिक्षा म्हणून परत मशीदीच्या ठिकाणी मंदिराची स्थापना करून दिली.

इथे थोडी शांतता स्थापित होत नाही तोच बिहार पेटला. बापूजींच्या अणुरेणूत हिंदू धर्माचे सत्त्व भरलेले होते. हिंदू धर्माला लाज येईल असे काम तेथील हिंदूंनी केले असल्यामुळे बिहारच्या करुण गोष्टींनी बापूजींच्या हृदय विदीर्ण झाले. धर्मग्रंथाचे अभ्यासू आणि त्यानुसार आचरण करण्याऱ्या बापूजींना हे सहन होऊ शकले नाही. यामुळे मार्च महिन्यात त्यांना बिहारमध्ये धावपळ करत जावे लागले.

बिहारमध्येही अशाच अडचणी होत्या. काळज्या आणि कडक उन्हात बिहारमधील गावोगावी फिरायला त्यांनी सुरुवात केली. वातावरण खूप अशांत होते. तिथे किती तरी वेळा अठरा अठरा तास काम करावे लागायचे. असे असले तरी बापूजींचे जीवन इतके नियमबद्ध होते की त्याकडे पाहून माणूस थक्क होत असे. झोपेवर इतके काही नियंत्रण होते की ते आंघोळीकरिता लांब टबमध्ये पडलेले असायचे, मी ‘सेफ्टी रेझर’ने त्यांची हजामत करत असायचे आणि बापूजींच्या नाकपुड्यातून ते घोरत असल्याचा आवाज ऐकू येऊ लागायचा. त्यांना गाढ झोप लागलेली असायची ! आणि दहायेक मिनिटात मी माझे काम आटोपत नाही तोच बापूजी ताजेतवाने होऊन उठलेच म्हणून समजायचे.

बिहारचे काम अधिक कठीण याकरिता होते की तिथे कुठेही वाद आणि भांडणे आढळत असत. असे असूनही बापूजींनी त्यांना प्रेमाने जिंकले. अनेकांनी बापूजींसमोर आपल्या गुन्ह्याची कबुली दिली.

मुसलमानांबद्दलची सहानुभूती दाखवण्यासाठी आणि प्रायश्चित्त म्हणून हिंदूंनी स्वतःहोऊन मदतनिधी गोळा केला.

अशा प्रकारे नोआखाली आणि बिहारमध्ये त्यांनी परिस्थितीवर अद्भुत विजय मिळवला. तेवढ्यातच हिंदुस्थानचे नवीन व्हाईसराय माऊंटबॅटन आले. त्यांनी बापूजींना नव्याने विचारविनिमय करण्याकरिता बोलावले. परंतु बापूजी तर देशाची फाळणी व्हावी या मताचेच नव्हते. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर "एका वडिलाच्या दोन मुलांचे पटत नसेल तर त्यांनी वाटल्यास आपसात' सल्लामसलत करून गुण्यागोविंदाप्रमाणे वेगळे व्हावे. त्यावर माझा आक्षेप नाही. परंतु बाहेरच्या माणसाने यात हस्तक्षेप करण्यात कुटुंबाची काय शोभा? अशाच प्रकारे संपूर्ण राष्ट्राचे सुकाणू वाटल्यास जिनासाहेबांनी आपल्या हाती घ्यावे, हवे असले तर त्यांनी काँग्रेससोबत सल्लामसलत करून वेगळे व्हावे. परंतु ब्रिटिशांनी या देशाची पाळणी करावी याहून देशाला कलंकित करणारी दुसरी कोणतीही गोष्ट असू शकत नाही". अशा प्रकारे मे महिन्याच्या चार तारखेला बापूजी जिनासाहेबांना भेटायला त्यांच्या बंगल्यावर जाऊन त्यांना विनंती केली  परंतु त्यात त्यांना यश मिळू शकले नाही. अखेरीस तीन जूनला फाळणीची घोषणा करण्यात आली. त्या वेळी बापूजींना आणि सरहद्द गांधींना म्हणजे पूज्य खानसाहेबांना जे दुःख झाले त्याचे वर्णन मी कसे करू? परंतु याच दिवसात त्यांच्या अंतःकरणावर किती मोठा आघात झाला होता ते ते त्यांच्याच शब्दात सांगते - "माझ्या चोहोकडे आगलोळ पेटलेला आहे. या ज्वाला मला भस्मसात करत नाहीत ही ईश्वराची करुणा आहे की तो माझी चेष्टा करत आहे?"

जुलैच्या अखेरीस आणि ऑगस्टच्या सुरुवातीला पंडितजींच्या कामाकरिता एक दोन दिवसांकरिता बापूजींना काश्मीरला जायचे होते आणि तिथून सरळ पंधरा ऑगस्टला त्यांना नोआखालीला पोहोचायचे होते. परंतु ठरवल्याप्रमाणे अनेक गोष्टी होत नसतात. कलकत्त्यात सांप्रदायिक आगीचे तांडवनृत्य सुरू होते. बंगालचे मुख्यमंत्री सुऱ्हावर्दीसाहेबांच्या विनंतीवरून बापूजी कलकत्त्यातच थांबले. परंतु तिथे थांबण्याकरिता त्यांनी अट घातली होती की नोआखालीत १५ ऑगस्टला वा त्यानंतर काही अघटित घडले तर त्याची जबाबदारी सुऱ्हावर्दीसाहेबांच्या डोक्यावर राहील. आणि जोपर्यंत बापूजी कलकत्त्यात राहतील तोपर्यंत सुऱ्हावर्दी साहेबांनी आपला मुक्काम बदलवून बापूजींबरोबरच राहायचे. तिथेच त्यांचे खाणेपिणे, भेटीगाठी वगैरे सर्व गोष्टी होणार होत्या. तिथे बंगालचे मुख्यमंत्री आणि बापूजींचा मुक्काम राहणार होता. बापूजींच्या या अटी सुऱ्हावर्दींनी कबूल केल्या आणि बापूजींनी आपला मुक्काम बेलियाघाटातील एक लहानशा घरात

हलवला. याच दरम्यान वोगवेगळे पुढारी आणि विद्यार्थी बंधुभगिनी बापूजींच्या भेटीगाठींकरिता यायचे. वेगवेगळ्या मोहल्ल्यात प्रार्थनासभा आयोजित करण्यात आल्या. अशा प्रकारे १५ ऑगस्टला शेकडो वर्षांच्या गुलामगिरीच्या बेड्या तुटल्या आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा सोनेरी अरुणोदय झाला. त्या दिवशी संपूर्ण कलकत्ता शहराला गांधीजींच्या दर्शनाचे वेड लागले होते. रमजान महिना असल्यामुळे काही मुसलमान बंधुभगिनींनी तर १५ ऑगस्टला राष्ट्रपित्याच्या दर्शनानंतरच जेवायचे ठरवले होते. चौदा तारखेच्या रात्री बारा वाजताच अबालवृद्ध स्त्रीपुरुष टोळ्यांनी, कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता बेलियाटमधील आमच्या लहानशा घरी मोठ्या संख्येत येऊ लागल्या.

या वेळी बापूजींची काय परिस्थिती होती? त्यांचा चेहरा गंभीर होता. या दिवशी जनतेने प्रकाशाचा झगमगाट केला. मिष्टान्न खाल्ले. आधुनिक भोळ्या शंकराने समुद्रमंथनाच्या वेळी चौदा रत्नांमधून ज्याप्रमाणे विषपान केले होते तसेच बापूजीरुपी भोळ्या शंकराने विषपान केले होते. १५ ऑगस्टला देशातील बंधुभगिनींमधील वैरभाव शमलेले असल्यामुळे बापूजींनी हा पवित्र दिवस  उपावास, कताई, मौन आणि हृदयातील दीप प्रज्वलित व्हावा म्हणून आत्मचिंतनात ईश्वराच्या प्रार्थनेत घालवला होता. हजारो लोक बापूजींच्या पाया पडायला आले. परंतु बापूजी तर नम्रतेची आणि निरभिमानतेची मूर्तीच होते. ते स्वतःच हात जोडून जनतेचे वंदन करत होते. हिंदुस्थानमधून इंग्रजाना जायला भाग पाडण्याकरिता जनतेने ज्या हालअपेष्टा सहन केल्या होत्या आणि सहकार्य केले होते तेच याचे कारण होते. बापूजी त्याकरिता जनतेचे आभारी होते.

परंतु या अपूर्व शांततेने आणि सल्लामसलतीने भरलेल्या वातावरणात विक्षेप निर्माण करण्याच्या संधीची जणू काही लोक वाटच पाहत बसलेच होते ! शांततेचा एक आठवडा समाधानकारकपणे पार पडला. तोच ३१ ऑगस्टला एकाएकी अशांततेचे वादळ उन्मळून पडले. रात्री दहा वाजता पाहता पाहता एक टोळके आमच्या घराच्या दारातून 'मारो, काटो'च्या घोषणा देत आत घुसले. या वेळी आमच्या संपूर्ण घरात तेवळ तीनचार लोकच होते. दुसऱ्या दिवशी नोआखालीला जायचे असल्यामुळे आम्ही त्याकरिता तयारी करत होतो. आणि सुऱ्हावर्दीसाहेब त्या वेळी इतर काही कामाची तयारी करण्याकरिता शहरात गेलेले होते.

वातावरणात खूप उत्तेजना पसरू लागली होती. बापूजी अंथरुणातून उठून उघड्या छातीने समोर येऊन उभे राहिले. त्या वेळी त्यांच्या अंगावर केवळ एक पंचा होता. त्यांचा मौनवार होता. परंतु त्यांनी मौन तोडले - क्या है? मुझे मारो. मुझे मारो. मुझे क्यो नही मार रहे हो? मला माझा देव विचारतो आहे की तू कुठे आहेस? फ र दुःखी झालो आहे. ही तुमची १५ ऑगस्टची शांती होती ना? अथक प्रयत्नांनंतर रात्री १२.३०

वाजता मोठ्या मुश्किलीने तो गोंधळ नियंत्रणात आला आणि ते टोळके विखुरले. “माहीत नाही उद्या जानकीनाथ काय वाढून ठेवणार आहे!” - तसे तर दुसऱ्या दिवशी नोआखालीला जाण्याकरिता आम्ही तयारी करत होतो. त्याऐवजी शांतीच्या या प्रखर पुजाऱ्याला हे अमानुषी कृत्य थांबवण्याकरिता उपवासाचा आधार घ्यावा लागला. त्या वेळेच्या त्यांच्या आत्ममंथनातून वेदनेची अशी अभिव्यक्ती झाली होती -

आज तर इथे लढाई सुरू आहे. आताच मी जखमांनी भरलेल्या दोन मुसलमानांचे मुडदे पाहून आलो. ऐकतो की किती तरी ठिकाणी हुल्लडींचा स्फोट होतो आहे. जो चमत्कार समजला जात होता तो तर केवळ चार दिवसांचे चांदणेच होता असेच म्हणावे लागेल. आता माझा धर्म काय आहे याचा मी विचार करतो आहे. यात मौन मदत करते आहे. असे काल सायंकाळी मी लिहवून घेतले होते. नंतर तर बरेच काही ऐकले. चोहोकडून लोक येऊ लागले. माझ्या धर्माचा विचार तर मी केव्हापासून करत होतो. त्यात अनेक बातम्यांची भर पडली. यामुळे उपवास करायचा विचार केला. हा काल रात्री ८.१५ पासून सुरू झाला आहे. राजाजी आले. उपवास करू नये म्हणून त्यांनी माझी खूप समजूत घातली. परंतु कोणताही युक्तिवाद गळी उतरू शकला नाही. माझा धर्म स्पष्ट दिसत होता. तू घाबरू नकोस. इतरांनीही घाबरू नये. घाबरून काही लाभ होणार नाही. पुढारी जर प्रामाणिक असतील तर हुल्लड थांबेल आणि उपवास सुटेल. जर हुल्लड थांबू शकणार नाही तर मी जगून दुसरे काय करणार आहे? माझ्यात जर लोकांना शांत करण्याची शक्ती नसेल तर माझ्याकरिता दुसरे काय करण्यासारखे असू शकते? . . .

ईश्वरकृपेने अशा संधीसाधू लोकांचे फावले नाही. ईश्वराने सर्वांच्या हृदयाला पाझर फोडला. अनेक भयंकर शस्त्रे बापूंच्या चरणी समर्पित करणारे गुन्हेगार गद्गद अंतःकरणाने बापूंची माफी मागत होते. आधी तर या मूठभर हाडे असलेल्या निःशस्त्र माणसासमोर अशी भयंकर शस्त्रे नेताना जणू काय ते लाजेने मरत होते! असे पावन करणारे दृश्य दिसू लागले होते. शांततेच्या साधकाचा ज्वलंत विजयाच्या दर्शनाचा हा क्षण माझ्या परम सौभाग्याचा क्षणसुद्धा होता.

या विजयावर शिक्कामोर्तब बंगालचे मुख्य मंत्र्यांनी आणि अनेक पुढाऱ्यानी घेतलेल्या पुढील शपथेने झाला -

We the undersigned promise to Gandhiji that now peace and quiet has been restored in Calcutta once again, we shall never again allow communal strife in the city and shall strive unto death to prevent it.

हा शपथविधी झाल्यानंतर बापूजींनी एक लहानसे प्रवचन केले. पंडितजींची बापूजींना तार होती की 'पंजाब पेटलेला आहे, आणि तिथे तुमच्या उपस्थितीची गरज आहे.' उपवासाच्या चौथ्या रात्री सुऱ्हावर्दी साहेबांच्या हातून मोसंबीचा रस घेऊन बापूजींनी उपवासाचे पारणे फेडले. आणि दुसऱ्याच दिवशी दिल्लीला होऊन पंजाबमध्ये जाण्याचा त्यांनी निर्धार केला. राजाजी आणि इतर पुढाऱ्यांनी इतक्या अशक्तपणात प्रवासाचा त्रास न घेण्याकरिता खूपच कळकळीची विनंती केली. परंतु बापूजी तर भावनांपेक्षा कर्तव्याला नेहमीच महत्त्व देत असत. यामुळे त्यांनी कोणाचेही ऐकले नाही.

नऊ सेप्टेंबरला बरोबर आठ वाजता बिरला भवनमध्ये बापूजींनी पाय ठेवला. सेप्टेंबर महिन्यातील दिल्लीतील हा भयानक रक्तरंजित संघर्ष कधीही विसरता येणार नाही. भंगी कॉलनी तर निर्वासितांनी भरून गेलेली होती. बापूजींना इथे उतरवून वाल्मिकी मंदिरात ठेवता येणे अशक्य होते. एखाद्या कुटुंबात आपसात खूप भांडण सुरू असावे आणि तशात कुटुंबात वडिलासारखी वडीलधारी व्यक्ती पोहोचली तर त्यांना जसे शांत शांत वाटते तशीच परिस्थिती बापूजींच्या दिल्लीतील आगमनामुळे पंडितजी, सरदारदादाआणि इतर पुढाऱ्यांची झाली होती.

दिल्लीत बापूजी पाच महिने राहिले. त्या दरम्यान त्यांनी देशविदेशातील पुढाऱ्यांशी सल्लामसलत केली, निर्वासितांच्या छावणीत जात असताना ज्या ज्या गावात दंगे झाले होते तिथे प्रार्थनासभा घेतल्या. शिवाय देशी राज्यांचा - संस्थानांचा प्रश्न हाती घेतला. लहानशा भावनगर राज्याची समस्या सोडवत असताना मोठमोठ्या संस्थानांच्या राजांची समजूत घालत त्यांना स्वेच्छेने विश्वस्त करण्याकरिता बापूजींचे प्रेम काम करत होते. अंकुशांविरुद्ध - नियंत्रणाविरुद्ध संघर्ष करून ते त्यांनी काढायला लावले.

१२ जानेवारीला बापूजींचा मौन दिवस होता. काही स्थानिक मुसलमान भाई बापूजींकडे रोज येत असत. तसेच ते त्या दिवशीही आले होते. त्यांनी तक्रार केली की, "आम्ही राष्ट्रीय मुसलमान आहो. आयुष्यभर आम्ही काँग्रेसकरिता लढलो. आता देश स्वतंत्र झाला तर आमचे सहकारी आम्हांला पाकिस्तानमध्ये जायला सांगत आहेत. तिथे तर आमच्याकरिता कोणतेही स्थान नाही. यामुळे आम्ही तुम्हाला विनंती करायला आलो की आम्हाला इंग्लंडला जाण्याचे तिकिट काढून द्यायला सांगा. तेथील लोक आमचा स्वीकार करतील."

गुलामगिरीपेक्षा आपल्या देशबांधवांच्या हातून मरण पत्करणे लाखपटीने चांगले असे वाटत असणाऱ्या बापूजींना हे शब्द सहन झाले नाही. त्यांनी आपल्या अंतर्मनाचा खूप शोध घेतला.

जवाहरलालजींपासून तर अनेक सहकारी बापूजींना भेटायला येऊन गेले होते. असे असूनही कोणाबरोबरसुद्धा त्यांनी वेगळ्या गोष्टी काही केल्या नव्हत्या. उलटपक्षी दररोजपेक्षा ते प्रसन्नचित्त वाटत होते. बापूजी मनातल्या मनात किती तरी अकल्पित संकल्प केले असतील.

मौनवाराच्या दिवशी बापूजी आपले प्रवचन इंग्रजीत लिहीत असतात. बापूजींच्या हिंदी भाषेतील लेखनाचा अनुवाद इंग्रजी भाषिक वर्तमानपत्रे विकृत करू टाकत असतात. यामुळे बापूजींनी ही पद्धत सुरू केली होती. सुशीलाबहेन त्याचा हिंदीत अनुवाद करायला बसल्या. सर्वात आधी त्यांच्याच लक्षात आले की बापूजींनी तेरा जानेवारीलाच उपवास करायचे निश्चित केले आहे ! कोणीही यासंबंधात वाद घालू नये अशी विनंतीही त्यांनी केली होती.

या अकल्पित संकटामुळे सर्वांना भयंकर धक्का लागला. अनेकांनी समजूत घातली, परंतु काहीही परिणाम झाला नाही. सर्वात शेवटी बापूजींचा सर्वात लहान मुलगा देवदासकाकांकडून राहवले नाही. त्यांनी लिहिले -

पू. पिताश्रींच्या सेवेत,

तुम्ही निवेदन देण्यात फार घाई केली आहे. अजून बऱ्याच सुधारणा करता येऊ शकल्या असत्या. उपवासाच्या योग्यतेबद्दल मला बरेच काही सांगायचे होते. परंतु मला तर काही कल्पनाच नव्हती. आणि मला कळवण्याचा कोणी त्रासही घेतला नाही. मी बऱ्याच आधी येऊ शकलो असतो आणि जे सांगायचे आहे ते सांगू शकलो असतो. परंतु चि. मनुने नुकताच मला ही बातमी सांगितली. माझी मुख्य काळजी आणि युक्तिवाद असा आहे की अखेरीस तुम्ही अधिरपणाला वश झाला. हे काम धैर्याचे होते. दिल्लीत आल्यानंतर धैर्याने मेहनत करून तुम्ही किती मोठे यश मिळवले आहे याची तुम्हाला कल्पना नाही. तुमच्या मेहनतीमुळे लाखो वाचले आहेत आणि अजून लाखो वाचले असते. परंतु तुम्ही अकस्मात धीर सोडला. या बाबतीत जिवंत राहून तुम्ही जे करू शकला असता ते मरून करू शकणार नाही. असा विचार करून वेळ राहताच उपवास सोडावा ही प्रार्थना.

चि. देवदासचे प्रणाम

पूज्य बापूंचे उत्तर -

१४ - १ - '४८

मकर संक्रांती

चि. देवदास,

सकाळच्या प्रार्थनेनंतर मी तुझे पत्र वाचले. काल तुझ्याशी जी चर्चा झाली होती तीही मी समजू शकतो. मी घाईघाईने वक्तव्य दिले असे तू ज्या अर्थाने म्हणतोस त्या अर्थाने मी ते देताना घाई केलेली नाही. परंतु एका अर्थाने तसे म्हणता येईल कारण सामान्यपणे असे वक्तव्य तयार करण्याकरिता मी जितका वेळ लावतो तितका या वेळी मी लावला नाही. याचे कारण याआधी त्यावर मी चार दिवस केलेले आत्मचिंतन आणि प्रार्थना आहे. ते वक्तव्य मी केलेले आत्मचिंतनाचे आणि प्रार्थनचे फळ आहे. यामुळे तो घाईघाईत घेतलेला निर्णय आहे असे ना तर माझ्या भाषेत म्हणता येऊ शकते ना ज्यांना याची माहिती आहे त्यांच्या भाषेत.

अभिव्यक्ती चांगली करण्याच्या दृष्टीने या वक्तव्याच्या भाषेत काही दुरुस्ती करण्याची आवश्यकता होती व तुझ्या सूचनेप्रमाणे मी ती केलीसुद्धा. माझ्या उपोषणाच्या योग्यायोग्यतेविषयी तुझ्याकडून वा इतर कोणाकडूनसुद्धा माझी काहीही ऐकण्याची इच्छा नाही. आतापर्यंत उपोषणासंबंधीचे मी तुझे म्हणणे जे ऐकून घेतले ते माझ्या धैर्याचे आणि विवेकाचे चिन्ह आहे. त्यासंबंधी विचार झाल्याबरोबर मी तुला त्याची सूचना दिली. तुझी मुख्य काळजी आणि तुझा युक्तिवाद निरर्थक आहे. हे खरे आहे की तू माझा मित्र आहेस. हेही खरे आहे की तुझी प्रगतीही झाली आहे. परंतु तू नेहमीच माझा मुलगा राहशील व त्यामुळे तुला काळजी वाटणे स्वाभाविक आहे. ते काहीही असले तरी तुझ्या युक्तिवादातून तुझे उथळ विचार आणि तुझा अधीरपणाच दिसतो. हे कार्य माझ्या धीराची परिसीमा आहे असे मी समजतो. ज्या धीरामुळे धीरामागील उद्दिष्टच नष्ट होत असेल त्याला धीर म्हणावे की मूर्खपणा? मी दिल्लीत आलो तेव्हापाून जे काही साध्य झाले असेल त्याचे श्रेय मी घेऊ शकत नाही. असे केले तर ती माझी अहंमन्यता होईल. माझ्या प्रयत्नांनी जरी एकादोघांचा जीव वाचला असेलही तरी त्याला या जगात काहीही किंमत नाही. केवळ सर्वज्ञ ईश्वरालाच त्याचे मूल्य कळू शकेल. "जो माणूस सेप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीपासून धीराने वागत होता तो आता एकाएकी अधीर झाला असे म्हणणे हे अज्ञानाचे नाही तर अजून कशाचे चिन्ह असू शकते?"

व्यावहारिक दृष्टीने विचार केला तर माणूस करू शकेल असे सर्व प्रयत्न करून झाल्यानंतर मी जेव्हा असहाय झालो तेव्हाच मी ईश्वराच्या मांडीवर डोके ठेवले. माझ्या उपोषणाचा अर्थ हा असा आहे. गजेंद्रमोक्ष वाच आणि त्यावर विचार कर. ते फार मोठे महाकाव्य आहे. त्यानंतरच मी उचललेल्या पावलाचे महत्त्व तुला कळू शकेल. तुझ्या पत्रातील शेवटचे वाक्य तुझ्या प्रेमाची सुंदर अभिव्यक्ती आहे. त्या प्रेमाचे मूळ अज्ञानात वा मोहात आहे. हा मोह सार्वत्रिक आहे म्हणून काही ते ज्ञानाचे स्थान घेऊ शकत नाही. जीवनमृत्यूचा प्रश्न जोपर्यंत आपण बाजूला ठेवू शकत नाही तोपर्यंत आपण जिवंत राहिलो तरच एखादे विशिष्ट काम होईल असे समजणे हा भ्रम आहे. जोपर्यंत जिवंत आहो तोपर्यंत प्रयत्न करत राहा असे म्हणायला चांगले वाटते परंतु प्रयत्न अनासक्त भावाने केले पाहिजे हे लक्षात ठेव. मी तुझी विनंती का मान्य केली नाही हे आता तुला कळेल. ज्या रामाने मला उपोषणाची प्रेरणा दिली त्या रामाची इच्छा असेल तर तोच मला उपोषण सोडण्याकरिताही सांगेल. मध्यंतरीच्या काळात तू, मी आणि आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे की राम मारेल तरी ते चांगले आहे, जिवंत ठेवील तरी ते तितकेच चांगले आहे. रामच मला जिवंत ठेवील वा मारेल. माझी केवळ एकच प्रार्थना आहे : 'हे रामा, जिवंत राहण्याच्या मोहाने मी वेळेआधीच उपोषण सोडण्याची इच्छा होऊ नये अशी शक्ती मला दे. मनूला सांगून लिहून घेतलेले हे पत्र जपून ठेव आणि त्यावर वेळेवेळी चिंतन कर.

आशीर्वाद,

बापू

ईश्वरकृपेने बापूजी या कसोटीतूनही पार पडले. आणि दिल्लीतील पुढाऱ्यांनी कलकत्त्याप्रमाणेच आपल्या शिरावर जबाबदारी घेतली. जानेवारीच्या १८ तारखेला दुपारी १२ वाजून ३७ मिनिटांनी मौलानासाहेबांच्या हातून मोसंबीचा रस घेऊन बापूजींनी उपवासाचे पारणे फेडले.

थोडी शक्ती आल्यानंतर बापूजी दिल्ली सोडण्याच्या तयारीत होते. परंतु कोणाला माहीत होते की १९४२ ते जो 'करेंगे या मरेंगे' या मंत्राचा जप करत होते त्याची पूर्तता दिल्ली शहरातच होणार आहे? २० जानेवारीला प्रार्थनेनंतर बापूजींनी प्रार्थनाप्रवचन सुरू केले. प्रवचन जवळपास संपायला आले होते. बापूजी प्रार्थनास्थळावरील खुर्चीवर बसलेले होते. चिकार गर्दी होती. मी त्यांच्या अगदी जवळ बसले होते आणि प्रवचनाची नोंद घेत होते. आजूबाजूला इतर लोकही होते. आणि अकस्मात एक भयंकर धडाका झाला. माझा तर असा काही थरकाप उडाला की मी बापूजींचे पायच धरले. प्रार्थनासभेतील लोक इकडेतिकडे धावपळ करू

लागले. बापूजी मला म्हणाले, “काय, घाबरलीस? अग, कोणी लष्करातील माणूस गोळीबाराचा सराव करत असेल. हे तर ठीक आहे, परंतु कोणी माणूस तुला वा मला खरोखर गोळी मारायला आला तर तू काय करशील?” असे म्हणून त्यांनी थोडे स्मित केले. मला कुठे माहीत होते की बापूजींचे हे शब्द भावीचे सूचक होते? मला जो विनोद वाटला त्यात अपूर्व गांभीर्य भरलेले होते?

हा धडाका बॉंबचाच होता आणि एका तरुणाने तो बापूजींना मारण्याकरिता केला होता ही हकिगत नंतर बाहेर आली.

या घटनेनंतर आम्ही जागे तर झालो नाहीच, उलट ‘राम राखे तेणे कोण चाखे’ या भावनेने आम्ही अजूनच निश्चिंत झालो. धोक्याची वेळ टळली असे आम्हांला वाटत होते. बापूजी स्वतःच्या मृत्यूविषयी तर निर्भयच होते. त्यांचे तर म्हणणेच होते की “ईश्वराला जर माझ्याकडून काम घ्यायचे असेल तर तो मला जिवंत ठेवील.”

आता पाहू एक असे अपूर्व दर्शन आणि ज्यामुळे हिंदुस्थानी जनतेच्या मनात काळजी भरली होती ते बापूजींच्या जीवनाचे अखेरचे चोवीस तास . . . .

बापूजी दिल्लीतील राकारणाच्या गोष्टी ऐकून खूपच अस्वस्थ झाले होते. जे लोक त्यांचे समजले जात होते त्यांच्याबद्दलही ते काहीसे असमाधानीच होते. लाखोंच्या संख्येत आलेल्या निर्वासितांची समस्यासुद्धा त्यांच्याकरिता काळजीचे कारण झालेली होती. २९ जानेवारीच्या रात्री बापूजी थकून गलितगात्र झालेले होते. मी तेल चोळत होते. म्हणाले, “आज माझ्या डोक्यात चक्कर चक्कर येत आहेत. माझ्या मनात विचार येतो की मी कोण आहे? काय करतो आहे? या अशांततेतून शांतता कशी मिळेल?” ‘है बहारे बाग दुनिया चंद रोज’ या भजनाचे एक कडवे म्हणाले. कोणाला माहीत होते की ही ‘चंद रोज’ची गोष्ट आता यापुढे नाही? आता तर केवळ काही तासच शिल्लक आहेत? थोड्या वेळात देवदासकाका आले. त्यांच्यासोबत थोड्या गोष्टी केल्या तोच बापूजींना खोकला आला. मी बापूजींना पेनिसिलीनची गोळी घेण्याचा आग्रह केला. खूपच करुण आणि गंभीर आवाजात म्हणाले -

“या यज्ञात (इतके की नोआखालीच्या यज्ञातही) तू एकटीच माझी भागीदार आहेस. मी कोणालाही शिकवले नाही तितके तुझी आई होऊन तुला शिकवले आहे. याकरिता मी हा इतका झगडलो. मी तुला या यज्ञात समर्पित केले आणि त्यातून तू सुखरूप, जशीच्यातशी बाहेर पडलीस. तुझ्यात मला जे आढळले ते

इतर कोणत्याही मुलीत आढळले नाही. यामुळे आज तुला एक गोष्ट सांगायची इच्छा आहे. ती तुला ही गोष्ट अनेकदा सांगितलेलीसुद्धा आहे. मी तुझी आई झालेलो असल्यामुळे मी जर आजाराने मरण पावलो, एका छोट्याशा फोडामुळे जरी मेलो, तरी तू जगाला ओरडून सांग आणि सिद्ध कर की, हा महात्मा ढोंगी होता! तू असे केलेस, तरच मी जिथे असेन, तिथे माझ्या आत्म्याला शांती मिळेल. यामुळे माझ्याकरिता तुला लोक जरी शिव्या देतील, मारून टाकतील तरी मी जर रोगाने मेलो तर तू मला दांभिक महात्माच ठरव. परंतु आठवड्यापूर्वी जो स्फोट झाला तशाच प्रकारे जर कोणी मला गोळीने मारेल आणि तसे होत असताना माझ्या तोंडून सुस्काराही बाहेर न पडता जर मी रामनामाचा जप करत असेन तर सांग की हा खरा महात्मा होता...."

हे ऐकून माझे डोळे भरून आले. एक शब्दसुद्धा बोलायची माझी हिंमत झाली नाही.

३० - १ - '४८

३० जानेवारीच्या सकाळी बापूजी नेहमीप्रमाणे भल्या पहाटे ३.३० वाजताच उठले. आम्हालाही प्रार्थनेकरिता उठवले. . . . बहेन उठल्या नाही. सध्या तर सुशीलाबहेन नाहीत. यामुळे गीतापाठ मलाच चालवावा लागत असतो. बहेन उठल्या नाही यामुळे बापूजी म्हणाले, "मला असे दिसते की माझ्याजवळ राहणारांवरसुद्धा माझा प्रभाव राहिलेला नाही. प्रार्थना हा तर आत्मा साफ करणारा झाडू आहे. आणि माझी तर प्रार्थनेवर अढळ श्रद्धा आहे. अशी प्रार्थना करणे ज्याला पसंत नाही त्यांनी तर माझा त्यागच करायला पाहिजे. हे दोघांकरिताही श्रेयस्कर होईल. तुझ्यात जर यांना समजावून सांगण्याची हिंमत असेल तर समजावून सांग. ही सगळी चिन्हे मला चांगली वाटत नाहीत. हे सर्व पाहण्याकरिता ईश्वर मला जिवंत ठेवणार नाही अशी आशा आहे. आज मला सगळ्यात आधी 'थाके न थाके छताए हो मानवी न लेजे विसामो' हे भजन ऐकायचे आहे."

कधी नाही ती आज बापूजींनी हे भजन ऐकण्याची इच्छा व्यक्त केली होती. मला स्वतःला बापूजींच्या काही गोष्टी आज वेगळ्याच वाटत होत्या. खोलवर शंका वाटते आहे की बापूजी परत उपवास तर करणार नाहीत?

बापूजींना खोकला येत होता. मी बापूजींना म्हणाले, "तुम्हाला पेनिसिलीनची गोळी देऊ काय? तुम्हाला परत खोकला येतो आहे." बापूजी खूपच गंभीर झाले आणि गंभीर होत म्हणाले,

“या यज्ञात मी तुझ्याशिवाय इतर कोणालाही साक्षी वा सहकारी म्हणून ठेवले नाही. आणि तू मला औषध घेण्याकरिता म्हणतेस? माझे रामबाण औषध तर रामनाम आहे. त्याने खोकला जायलाच पाहिजे. माणसाचा अंतच माणसाच्या जीवनाचा प्रतिबिंब असतो. आठवड्यापूर्वी ज्या प्रकारे धडाका झाला होता त्याप्रमाणे कोणी मला समोरून छातीवर गोळी मारील तर आणि त्यामुळे माझ्या तोंडून जर सुस्कारा न निघता ‘राम राम’ निघाले तर समजशील की हा खरा महात्मा होता. आणि जर मला रोगाने, अग, लहानशा फोडफुंणशीने जरी मला मरण आले तर तू जगाला ओरडून ओरडून सांगशील की हा दांभिक महात्मा होता.” सकाळी पाच वाजताचे बापूजींचे हे शब्द !

रात्री काँग्रेसच्या घटनेचा मसुदा लिहिला. (जो आज तर शेवटचे मृत्यूपत्रच झाला आहे!) बापूजींनी किशोरीलालभाई मश्रूवालांना लिहिलेल्या त्या पत्रातून जणू काय भाकीतच व्यक्त करत होते -

> आज (प्रातः) प्रार्थनेनंतरचा वेळ पत्रे लिहिण्याकरिता देतो आहे. . . . माझी तिथे येण्याची गोष्ट अफवा समजशील. तिथे ३ ते १२ तारखेपर्यंत राहायची गोष्ट करतो आहे. दिल्लीत काही करायचे असेल प्रतिज्ञापालन करायचे असेल तर मी इथे राहायला नको. हे माझ्या येथील सहकाऱ्यांवर अवलंबून आहे.

आज दुपारी सरदारदादासुद्धा भेटायला येणार आहेत. आणि ते आणि बापूजी एकांतात चर्चा करणार आहेत. आणि मग उद्या वा परवा कार्यकारिणी बोलावून योग्य तो निर्णय घेणार आहेत. पाहू या, ईश्वर काय करतो ते खरे. उद्या सकाळी माझे वडीलसुद्धा इथे येणार आहेत.

प्रार्थनेनंतर बापूजींना ओसरीतून आत आणले. त्यांच्यावर पांघरूण टाकले आणि बापूजींनी काल जो काँग्रेसच्या घटनेचा मसुदा तयार केला होता त्यात ते सुधारणा करू लागले. दररोजप्रमाणे पाऊणेपाच वाजता गरम पाणी, मध आणि लिंबू घेतले. पाऊणेसहा वाजता रोजप्रमाणे संत्र्याचा रस घेतला.

अजूनही उपवासाचा अशक्तपणा आहेच. लिहिता लिहिता बापूजींना थकवा वाटू लागल्यामुळे ते झोपले. मी त्यांचे पाय चेपले.

किशोरीलालभाईंना पत्र लिहिले होते. त्याबदंदल मी बापूजींनी विचारले की ‘आपण दोन तारखेला निघणार आहो’ अशी एक ओळ यात टाकू काय? बापूजी म्हणाले, “उद्याचे कोणी पाहिले आहे? जर जायचे

नक्की ठरले तर आजच्या प्रार्थनेत तसे सांगेन आणि रात्री जेव्हा व्याख्यानाचे रेडिओवर प्रसारण होईल तेव्हा त्यात ते येईलच".

फिरत असताना श्रीमती राजेन नेहरू आल्या. मी फिरणार नव्हते, पण फिरण्याकरिता उठवले. आठ वाजता नेहमीप्रमाणे मालीश, आंघोळ. मालीश सुरू असताना वर्तमानपत्रे पाहिली. बंगाली पाठ केला. मालीशच्या खोलीतून न्हाणीघरापर्यंत येत असताना प्यारेलालजींना बापूजी म्हणाले की त्या लेखात जर काही वैचारिक उणीव राहिली असेल तर तू ती पूर्ण करशील. "काल रात्री कॉँग्रेससंबंधीचा मसुदा हरिजनमध्ये पाठवण्याकरिता मी तयार केला आहे. तो नीट पाहून घेशील. तो तयार केला तेव्हा मी फार थकलेलो होतो".

नेहमीप्रमाणे मी बापूजींना आंघोळ घालत होते. मला म्हणाले, "तू हातांचा व्यायाम करत असतेस की नाही?" मी नाही म्हणाले. बापूजी म्हणाले, "हे मला मुळीच पटत नाही." मी म्हणाले की यानंतर मी करीन. बापूजी म्हणाले, "तुझे वजन वाढत नाही. तब्येतीत सुधारणा नाही याचे मला दुःख होते. तू नोआखालीला तुझ्या वडिलांकडून जेव्हा आली होतीस तेव्हा किती धडधाकट होतीस ! तुझी प्रकृती दुरुस्त होत नाही याचे कारण तुझा भावनाप्रधान स्वभाव आहे. कोणाच्याही दुःखाने खूप दुःखी होऊ नये आणि कोणाच्या आनंदाने खूप खूशही व्हायला नको. असा समतोल स्वभाव ठेवला तरच ईश्वराचे सानिध्य मिळवणे सहज होते. हा कायदा माझा नाही. हा अनादी काळापासूनचा आहे आणि सर्वच धर्मग्रंथांत आहे. स्थितप्रज्ञ होण्याकरिता जी जी लक्षणे सांगितली आहेत त्यात हेसुद्धा लक्षण आहे. तू अठरा वर्षांची उमलती मुलगी आहेस. मी तुझे मन किती घडवले आहे याची आज तुला कल्पना येणार नाही, परंतु नोआखालीपासून तर आजपर्यंत मी तुला किती कसले आहे, तुला किती नवनवीन अनुभवांनी घडवले आहे याच्या परिणामाचे मूल्य शक्य आहे की तुला आज कळणार नाही. परंतु तुझ्या भावी जीवनाकरिता ते खूप उपयोगी ठरतील. मी जिवंत राहो वा न राहो, तू या शब्दांची नोंद करून ठेव. तुला माहीत आहे की आज सकाळी . . . प्रार्थनेकरिता उठली नव्हती. यामुळे माझ्या मनात विचार येत होता की माझ्यात कोणती उणीव आहे? परंतु या यज्ञात इतर कोणतीही मुलगी नाही. परंतु तुझी ज्याप्रमाणे सेवेतून वा माझ्या इतर कोणत्याही कामांच्या जबाबदारीतून सुटका होऊ शकत नाही त्याचप्रमाणे तू तुझ्या प्रकतीची काळजी घेणे हासुद्धा माझ्या सेवेचा एक भागच आहे आणि ती जबाबदारीही तू पार पाडायला पाहिजे."

आंघोळीच्या वेळी बापूजींनी हे सर्व अतिशय वात्सल्यपूर्ण भावनेने सांगितले आणि माझ्या पाठीवर प्रेमळ हात पिरवला.

आंघोळ केल्यानंतर वजन केले. १०९.५ पौंड होते. जेवणात वाफाळलेली भाजी, १२ अंस दूध, एखाद मुळा, पिकलेले चार टमाटे आणि चार संत्र्यांचा रस घेतला.

आंघोळ केल्यानंतर वजन केले. १०९.५ पौंड होते. जेवणात वाफाळलेली भाजी, १२ अंस दूध, एखाद मुळा, पिकलेले चार टमाटे आणि चार संत्र्यांचा रस घेतला.

जेवत असताना प्यारेलालजींशी नोआखालीशी संबंधित गोष्टी केल्या. नंतर वस्तीच्या फेरबदलासंबंधी चर्चा करताना बापूजी स्पष्टपणे म्हणाले, “आपण ‘करेंगे या मरेंगे’ हा मंत्र घेऊन नोआखालीत गेलो होतो. मी जरी इथे बसलेलो असेन तरी नोआखालीच्या कामाकरिताच बसलेलो आहे. अशाच प्रकारे जनतेलासुद्धा आपण तयार केले पाहिजे. तिनेही आपला स्वाभिमान आणि आपली अब्रू यांच्याकरिता धैर्याने तिथेच राहायला पाहिजे. शेवटी शक्य आहे की तिथे माझ्यासारखे फार कमी वेडपट लोकच शिल्लक राहतील. पण जर दुर्बलतेतूनच सामर्थ्य निर्माण करायचे असेल, तर दुसरा काय उपाय असू शकतो? सशस्त्र युद्धातही सामान्य सैनिकांच्याच धैर्यावर सर्व काही अवलंबून नसते काय? तर मग अहिंसक युद्धात दुसरे काय शक्य आहे?” आणि त्यांनी नोआखालीला जाण्याचाच विचार परत सुचीत केला.

यानंतर बापूजींनी पायांना तूप चोळवून घेत आराम केला. लहानशी डुलकी घेऊन बापूजी न्हाणीघरात जाण्याकरिता बाहेरील लाकडी फळीवरून उठून आत येत असताना मी म्हणाले, “बापूजी एकटेच येत आहा, कसे वाटते (अशक्तपणामुळे, आधाराशिवाय चालताना)?” बापूजी म्हणाले,”किती चांगले? एकला चलो !”

डॉ. भार्गवच्या परिचर्या गृहाकरिता एक घर पाहिजे होते त्याबद्दल आणि एका अनाथाश्रमाबद्दल १२.३० वाजता बापूजी बोलत होते. इथे जे स्थानिक मुसलमान येत असतात ते आले की या गोष्टीची आठवण करून द्यायला बापूजींनी मला सांगितले. ते पुढे म्हणाले, “अशा प्रकारे मला घाबरून सरकार किती दिवस चालणार आहे? मला घाबरून नाही तर त्यांनी आपल्या मनाने काम करायला पाहिजे. नियोगी इथे येतील तेव्हा विचारशील बरे.”

परंतु बापूजींकडे जेव्हा मुसलमान आले तेव्हा मी आठवण करून दिली. तर बापूजी म्हणाले, “आताच यांना अडवले नाही तर चांगले होईल.” मग त्यांना म्हणाले, “ठीक आहे, मी तर सहज विचारले होते. यात आपण काय वेळ घालवायचा?”

त्यानंतर मौलाना हबिबुर रहमानना सेवाग्रामला जाण्यासंबंधी बापूजींनी विचारले. ते म्हणाले, “तुम्ही जा. परंतु १४ ला परत मात्र या.”

बापूजी म्हणाले, “हो, हो, १४ ला मी इथेच असेन. परंतु तरीही सर्व काही तर खुदाच्याच हाती आहे. ही तर अस्मानीसुलतानीची गोष्ट आहे.”

महादेवकाकांचे जीवनचरित्र लिहिणे, त्यांच्या रोजनिश्यांचे संपादन करणे वगैरे काम किती दिवसांपासून रेंगाळले होते. त्यासंबंधात बापूजी शांतिकुमार भाईशी बोलले. शांतिकुमार भाईची तक्रार होती की चंद्रकुमार भाई आणि नवजीवन ट्रसटमध्ये वाद सुरू आहे. खूप पैसे घेण्याची गोष्ट आहे. बापूजी म्हणाले, “यादव जसे आपसात कापले गेले होते तशीच जिकडे पाहावे तिकडे आपली परिस्थिती दिसते आहे. आपल्या आपसातील वादांमुळे आपण समाजाचे किती मोठे नुकसान करतो याचा विचार कोणीही करत नाही. आणि हा विचार कोणी का करावा? हा सर्व माझाच दोष आहे. ईश्वराने मला आंधळा केले त्याला कोण काय करील? परंतु माझ्या जिवंतपणी यात जितकी सुधारणा करता येत असेल तितकी तर करतो म्हणजे भावी पिढीच्या शिव्या तरी मला खाव्या लागणार नाहीत. याकरिता तर ईश्वराचे उपकारच मानायचे.”

“मला हे काम करायचे आहे. या रोजनिशा पुस्तकाच्या आकारात तयार करायच्या आहेत. नरहरीची प्रकृती चांगली नाही आणि आता . . . ने तर माझ्या सर्व कामांमधून निवृत्ती घेतली आहे. परंतु प्रत्येक जण आपापल्या विचारात स्वतंत्र असल्यामुळे समजूनउमजून निवृत्ती घेतली नाही असे तरी कसे म्हणू शकतो? चंद्रशंकर जर हे ओझे उचलेल तर त्याची कला यामुळे अजून फुलेल. या दोघांच्याही अक्षरात किती साम्य आहे? मी त्याला लिहीन.”

मुलाखतीकरिता येणारात लंकेचे प्रतिनिधी डॉ. सिल्वा आणि त्यांची मुलगी प्रमुख होते. त्यांना स्वाक्षरी दिली.

दुपारी बिसेनभाईंच्या मदतीने गोळा झालेल्या टपालाचे काम पूर्ण करायला सांगितले. दोन वाजता माती घेतली, मी पाय दाबले. बापूजी उठले तेव्हा त्यांची बापूजींची परवानगी घेऊन शहरात एका नातेवाईकाला भेटायला गेले. तिथून ४.१५ ला परतले. बापूजी आणि सरदारदादा गोष्टी करू लागले. . . . काठियावाडसंबंधी चर्चा झाली. मध्येच काठियावाडचे पुढारी रसिकभाई परीख आणि ढेबरभाई आले. त्यांना बापूंना भेटायचे होते. परंतु आज एकेक क्षण भरगच्च होता. यामुळे बापूजींना विचारून नक्की वेळ ठरवते

आणि मग सांगते असे मी त्यांना म्हणाले. बापूजी आणि सरदारदादा गोष्टींमध्ये खूपच गुंग होते. मी विचारले तर म्हणाले, ”त्यांना सांग की जिवंत असलो तर प्रार्थनेनंतर परतताना तुमच्याशी बोलेन.” मी त्यांना प्रार्थनेकरिता थांबायला सांगितले कारण प्रार्थनेतून परतताना जर लगेच भेट झाली नाही आणि मध्येच दुसराच कोणी घुसला तर बोलणे होऊ शकले नसते म्हणून मी त्यांना थांबायला सांगितले होते. त्यांना बाजूच्या खोलीत बसवले.

[इतकी रोजनिशी मी सायंकाळी पाच वाजताच्या दरम्यान लिहिली होती. यानंतरची रोजनिशी मी एकतीस तारखेच्या रात्री दोन वाजता लिहिते आहे.]

बापूजी सरदारदादांशी बोलण्यात इतके तल्लीन झाले होते की त्यांना दहा मिनिट उशीर झाला. या गंभीर वातावरणात अडथळा आणण्याचा कोणालाही धीर झाला नाही. वेळेवर आठवण दिली नाही तर बापूजी आमच्यावर रागावतील हे माहीत असल्यामुळे अखेरीस मणिबहेनने हिंमत केली. गोष्टी करता करताच त्यांनी जेवण घेतले. त्यात चौदा अंस बकरीचे दूध, चौदा अंस भाजीचे सूप आणि तीन संत्री घेतली. आणि गोष्टी करता करता कताईसुद्धा केली.

“यज्ञ केल्याशिवाय जो खातो तो चोरीचे खातो.” आणि सकाळी म्हणायला लावलेले हे भजन -

थाके न थाके छतांये हो मानवी ! न लेजे विसामो,
ने झूंझजे एकल बाये, हो मानवी, न लेजे विसामो,
तारे उल्लंघवाना मारग भुलामणा,
तारे उद्धारवानां जीवन दयामणा,
हिंमत न हारजे तुं क्यांये हो मानवी, न लेजे विसामो !

जीवनने पंथ जतां तापथाक लागशे,
वधती विटंबणा सहतां तुं थाकशे.
सहता संकट ए बधांये हो मानवी, न लेजे विसामो !

जाजे वटावी तुज आफतनो टेकरो,
आगे आगे हशे वणखेड्या खेतरो.
खंते खेडे ए बधांये, हो मानवी, न लेजे विसामो !

झांखा जगतमां एकलो प्रकाशजे,
आवे अंधार तेने एकलो विदारजे.
छोने आ आवजुं हणाये, हो मानवी, न लेजे विसामो !

लेजे विसामो न क्यांये, हो मानवी, न देजे विसामो.
तारी हैयावरखडीने छांये, हो मानवी, न देजे विसामो.

(चा भजनाचा भावार्थ-

थकलेला असो वा नसो, हे मानवा घेऊ नकोस तू विसावा,
लढत राहा एकटाच, हे मानवा, घेऊ नकोस तू विसावा!
असेल जरी तुझा मार्ग भुलवणारा,
तरी तुझे जीवन उद्धारणारा तो दयासागर आहेच.
आली कितीही बिकट वेळ जरी तरी तू धीर सोडू नकोस,
हे मानवा, घेऊ नकोस तू विसावा !
जीवनपथावर त्रास, थकवा तर जाणवतीलच;
थकशील तू सहन करताना वाढती विटंबना,
सामना करत असताना अशा सर्व संकटांचा.
हे मानवा, घेऊ नकोस तू विसावा!
संकटांचे डोंगर चढून गेल्यावर,
लागतील तुला वनराई, शेते.
तरीही राहा सावध तू, आणि धीर ठेवून चालत राहा,
हे मानवा, घेऊ नकोस तू विसावा !
तुझ्या मार्ग जरी असेल काळोखाने भरलेला,
तरी तू एकटाच कर प्रकाशित तो,
हे मानवा, घेऊ नकोस तू विसावा !
दाबत असेल तुझा आवाज कोणी तरीही,
हे मानवा, घेऊ नकोस तू विसावा !

दे तुझ्या अंतःकरणाची सावली या जगाला,

हे मानवा, घेऊ नकोस तू विसावा !)

ब्राह्ममुहूर्ताच्या प्रार्थनेच्या वेळी हे भजन खास पसंती म्हणून बापूजींनी मला गायला लावले यावरून त्यांना आपल्या मनातील इच्छा मूर्तिमंत साकार करायची असावी. असो. तरीही पळाचाही 'विसामो' न घेता आपल्या कामाकाजाच्या ज्वलंत प्रवृतीप्रमाणे ते आपले काम पुढे रेटतच होते. ते एकदम उठले. मी रोजप्रमाणे माझ्या हातात पेन, बापूजींची माळ, थूकदाणी, चष्म्याचे घर आणि दररोज ज्यात बापूजी प्रवचन लिहितात ती वही घेतली होती.

प्रार्थनेला दहा मिनिट वेळ झाल्यामुळे रस्त्यात त्यांनी असमाधान व्यक्त केले. म्हणाले, "तुम्ही माझे घड्याळ आहा ना? मग मी का घड्याळ पाहत बसू?" आजकाल बापूजी विशेषेकरून घड्याळ पाहतच नाहीत. प्रसंगोपात आम्हीच ते पाहत असतो आणि आमचे काम आटोपत असतो. घड्याळाला चाबीसुद्धा आमच्यापैकीच कोणी तरी देत असतो. यामुळे आम्ही म्हणालो, "बापूजी तुमचे बिचारे घड्याळ झुरत असेल." त्यावर बापूजींनी केला, "तुम्हीच माझ्या घड्याळ आहात ना?"

पण त्याचबरोबर मला म्हणाले, "अशा प्रकारे उशीर होणे मला मुळीच आवडत नाही." आजकाल आम्ही द्रव पदार्थाचे प्रमाण वाढवले होते, ते कमी करायला सांगितले. उपवासानंतर अजून धान्य तर सुरू केलेलेच नव्हते. अशा गोष्टी करत आम्ही प्रार्थनास्थळाच्या पायऱ्या चढू लगलो. "प्रार्थनेकरिता दहा मिनिट वेळ झाला हा तुमचा दोष आहे. "परिचारिकेने तर साक्षात ईश्वर जरी बसलेला असेल तरी तिने आपले कर्तव्य बजावले पाहिजे. एखाद्या आजाऱ्याला औषध द्यायची वेळ झाली असेल आणि त्याच्याजवळ कसे जावे असा जर ती विचार करू लागली तर रोगी मरूनच जाईल ना? हेसुद्धा असेच आहे. प्रार्थनेकरिता एक मिनिट जरी वेळ झाला तरी मला खुपते."

मी बापूजींच्या उजव्या बाजूला होते बापूजींचा उजवा हात माझ्या माझ्या खांद्यावर होता एवढ्या माझ्या बाजूने एक धष्टपुष्ट तरुण खाकी कपड्यात हात जोडून लोकांना ढकलत धडपडत एकदम माझ्या बाजूने पुढे आला. मला वाटले की याची इच्छा बापूजींच्या पाया पडायची आहे. आणि असे रोजच होत असे.

बापूजीना जरी आवडत नव्हते तरी लोक चरणस्पर्श करायला वा प्रणाम करायला यायचेच. तेव्हा आम्ही त्यांना आमच्या पद्धतीने समजावून सांगत असू की बापूजींना पाया पडणे पसंत नाही. यामुळे मीसुद्धा

पुढे येत असलेल्या या तरुणाला हाताने धक्का मारत म्हणाले, “भाई बापूंना आधीच दहा मिनिट उशीर झाला आहे, तुम्ही त्यांना का त्रास देता !” परंतु त्या तरुणाने मला इतक्या जोरात धक्का मारला की माझ्या हातातील माळ, थूकदाणी, वही वगैरे साहित्य खाली पडले. इतर वस्तू जरी पडत होत्या तरी मी फारसा प्रतिसाद दिला नाही आणि त्या बंधूसोबत झुंजत राहिले. पण जशी माळ पडली आणि ती उचलण्यासाठी मी खाली वाकले, तितक्यात धडाधड एकामागे एक अशा तीन गोळ्या सुटल्या. अंधार, धुराचा लोट आणि गगनभेदी आवाजात बापूजी समोरच्या पावलांवर आणि छातीवर खाली कोसळत होते. 'हे रा...म, हे रा...म' असे म्हणत, हात जोडलेल्या स्थितीतच ते जमिनीवर कोसळले. त्या वेळी अनेकांनी बापूजींना पकडण्याचा प्रयत्न केला, परंतु सर्व निरर्थक ठरले. मला तर कळू शकले नव्हते की हे काय होते आहे? बहुतांश जनता तीनचार मिनिट स्तब्ध झालेली होती ! गोळ्यांचा भयंकर आवाज तर माझ्या कानाजवळच झाला होता. यामुळे माझे कान बधीर झाले होते. आम्हा मुलीचे या वेळी काय हाल झाले असतील हे भाषेत लिहिणे कठीण आहे. परंतु पांढऱ्या शुभ्र वस्त्रांवरून रक्ताची धार वाहत होती. रक्ताने कपडे भरून गेले ! (जवळच असलेला) खड्डा रक्ताने भरून गेला. बापूजींचे हात जोडलेलेच होते. त्यांच्या घड्याळात त्या वेळी ५.१७ झाले होते. हात जोडलेल्या अवस्थेत बापूजी हिरव्यागार गवताच्या अंथरुणावर धरतीमातेच्या मांडीवर जणू ते चिर निद्रेत झोपलेले होते. आणि जणू काय आपल्या दुर्बलतेवर राग करू नका आणि माझी माफी मागू नका असेच ते आम्हांला विनंती करत होते ! त्यांना खोलीत न्यायला आम्हांला दहाएक मिनिट तर लागलेच असतील. दुर्दैवाने तिथे कोणीही डॉक्टर उपस्थित नव्हता. सुशीलाबहेनची प्रथमोपचाराची पेटी तपासली, परंतु त्यात विशेष असे कोणतेही औषध मिळाले नाही. ते तर म्हणतच होते की माझा खरा डॉक्टर रामच आहे. हे माहीत असूनही असे वाटते की बापूजींनी स्वतःसाठी स्वीकारलेल्या सिद्धांतांना अपवित्र समजून आम्ही त्यांचे उल्लंघन करू लागलो होतो. आणि आम्ही अल्पात्मा, आमच्या स्वार्थासाठी त्यांना जगवण्याचा प्रयत्न करू लागलो होतो. याशिवाय वेगळे काही सुचतच नव्हते !

सरदारदादा तर अजून घरी पोहोचलेसुद्धा नव्हते, ते परत वळले. आम्ही तर टाहो फोडून आक्रंदन करत होतो. परंतु बापूजींना आज काही आमच्याबद्दल दया वाटेल तर ना ! अनेकदा माझ्यासारखी जर उदास झालेली दिसली तर बापूजी लगेच त्याचे कारण विचारायचे आणि ते कळल्यानंतरच सोडायचे. आज मात्र बापूजी सर्व काही सहन करत होते !

सात बार असलेल्या स्वयंचलित पिस्तुलातील पहिली गोळी मध्यरेषेच्या साडेतीन इंच उजव्या बाजूला, बेंबीच्या अडीच इंच वर पोटात लागली होती. दुसरी मध्यरेषेपासून एक इंच दूर आणि तिसरी छातीत

उजव्या बाजूला मध्यरेषेपासून चार इंच दूर लागली होती. पहिली आणि दुसरी गोळी शरीराच्या आरपार निघून गेली होती. तिसरी फुफ्फुसात फसली होती. तिचे कवच नंतर कपड्यांमध्ये सापडले होते. आणि आरपार गेलेली गोळी तर प्रार्थनास्थळावरच सापडली होती. खूप रक्तस्त्राव झाल्यामुळे बापूजींचा चेहरा पांढराफटक पडला होता.

भाईसाहेब (श्री ब्रजकिशोर चांदीवाला) कठोर होऊन दवाखान्यात फोनवर फोन करत होते !. बाहेर हजारो लोकांची गर्दी होऊ लागलेली होती. आणि मोठ्या मुश्किलीने भाईसाहेब सरदारच्या बंगल्यावरून विलिंग्डन रुग्णालयात पोहोचले. परंतु तिथे कशाचाही थांगपत्ता न लागल्यामुळे ते तसेच माघारी फिरले. दरम्यान कनैयालाल मुंशी आले. सरदारदादा लगेच येऊन पोहोचले. मणिबहेनने आम्हांला धीर दिला. मला गीतापाठ सुरू करायला सांगितले. मणिबहेन आल्यामुळे आणि त्याचबरोबर सरदारदादांच्या आश्वासक गोड फुंकरीमुळे मी थोडी भानावर आले आणि गीतापाठ सुरू केला. मुंशींनी यात चांगलीच साथ दिली. तेवढ्यात कर्नल भागवत येऊन पोहोचले. ते बापूंना तपासू लागले. यामुळे बिरला भवनच्या परिसरातील सरदारदादापासून तर आम्ही सगळे काही चांगली बातमी कळते की काय अशा उत्सुकतेने भरलेलो होतो. एक आश्वासक लहर आम्हां सर्वांना स्पर्शून गेली. डॉक्टर भागवतांना तर पाहताच कळले की आता काहीही शिल्लक नाही, सगळे संपलेले आहे ! परंतु डॉक्टर अखेरपर्यंत सांगत नाही असा वाक्प्रचार आहे ना? अशाच प्रकारे गोडसेच्या गोळीने बापूंचा वेध घेतल्यानंतरही बापूजींचा गोळी लागून मृत्यू झाल्याची बातमी डॉक्टरांसाठीही अत्यंत वेदनादायक असली तरी ती हकिगतच होती. असे असतानाही जगाला या महापुरुषाचा श्वासोच्छ्वास बद झाला आहे आणि हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या राष्ट्रपित्याचा प्राण घेणारा एक हिंदुस्थानी तरुणच आहे हे सांगायला डॉक्टरला फार मजबूत छाती लागत होती.

कर्नल भागवत मला स्वतःची मुलगीच मानत होते. त्यांनी माझी खूप सेवा केली होती. माझ्या अपेंडिसायटिसवर त्यांनीच पटण्यात शस्त्रक्रिया केली होती. आणि सकाळीच त्यांच्या आणि त्यांच्या परिचर्यागृहासंबंधी गोष्टी झाल्या होत्या. याच डॉक्टरांना काहीच तासात ही अकल्पित बातमी जगाला सांगावी लागली. किती करुण गोष्ट

त्यांनी वेळ घालवण्यासाठीच तपासण्याकरिता दहा ते पंधरा मिनिट लावले. या दहापंधरा मिनिटात बिरलाभवनमधील या खोलीत अनेकांचा आत्मा डॉक्टरच्या तोंडून 'नाही, आपण यांना वाचवू!' हे शब्द

ऐकायला आतुरलेला होता. तेवढ्याकरिता सर्वांचे रुदन थांबले होते आणि ते आशेने डॉक्टरकडे पाहत होते.परंतु शेवटी ते म्हणाले, “मनू बेटी, अब बापू नही रहे. . . !”

या आघातजनक बातमीनंतर खोलीतील आम्हा मुलांचा आणि मोठ्या माणसांचा भयंकर विलाप ऐकू येत होता. थोड्याच वेळात देवदास काका आणि गोपू हे दोघेही - सर्वात लहान मुलगा आणि सर्वात लहान नातू - बापूंच्या छातीवर डोके ठेवून भयंकर दुःखाने आक्रंदन करत होते. आणि पंडितजी - बापरे! ईश्वराने तर असा दिवस शत्रूलाही दाखवू नये. ते तर एखाद्या लहान मुलाप्रमाणे सरदारदादांच्या गुडघ्यावर डोके टेकवून हमसून हमसून रडत होते. असे असताना आमच्यासारख्यांबद्दल काय बोलायचे?

पाहता पाहता लाखोची गर्दी गोळा झाली होती. जवळपास एक तास हे असेच सुरू होते. अखेरीस सरदारदादांनी लोहपुरुषाप्रमाणे या कठीण परीक्षेत उत्तीर्ण होण्याकरिता योग्य ते निर्णय घेण्यात काहीही कमी ठेवले नाही. ते सर्वांना धीर देत होते. बापूंच्या चष्म्याचा आणि शेवटच्या चपलांचा पत्ता नव्हता. बापूजींनी तीस तारखेला प्रार्थनेत जाताजाता नखे काढली होती आणि मला ती फेकायला दिली होती. परंतु रसिकभाई आणि ढेबरभाईंशी गोष्टी करण्यात मी गुतल्यामुळे ती नखे कागदावर तशीच पडून राहिली होती. अनमोल रत्नाप्रमाणे मी ती उचलली आणि पेटीत ठेवून दिली. एका आंगठ्याचे, एका बोटाचे आणि एका करंगळीचे नख ! त्यांच्या शरीराची शेवटची स्मृती म्हणून, प्रसादी म्हणून ती नखे आजही माझ्याजवळ आहेत.

अखेरीस माऊंटबॅटनसाहेबांनी सर्वांना शांत केले. बाहेरचा जनसमुदाय पू. बापूची माहिती जाणून घेण्याकरिता आतुरलेला होता. यामुळे सरदारदादांनी रेडिओवरून सर्व काही जाहीर केले. पंडितजी तर बोलूच शकत नव्हते. खूपच हिंमत गोळा करून म्हणाले, “हमारे बापू . . . ” मग हुंदके देत म्हणाले, “बापू अब हमारे पास नही रहे . . .” जनतेचा इतका विलाप सुरू होता की या वेळी ही भूमीसुद्धा थरथरू लागली आहे की काय असे वाटू लागले होते

राष्ट्रपित्याच्या अखेरच्या दर्नाकरिता जनता आतुरलेली होती. जनतेच्या या असामान्य गर्दीला बापूंचे दर्शन घेता यावे म्हणून बिरलाभवनच्या गच्चीवर व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला. या वेळी मी काही कामाकरिता बाहेर निघाले. पंडितजींनी मला एकदम धरले आणि क्षणभर विसरूनच गेले की बापू आता नाहीत. म्हणाले, “मनू आओ, बापूको पुछो अब कैसे करना !” हे ऐकून तर मी स्तब्धच झाले ! अरे देवा . . . इतके मोठे विद्वान पंडितजींच्या हृदयाची काय ही करुण दशा ! मला तर त्यांना पाहूनच रडू फुटले, आणि तेही

तितकेच रडू लागले. आम्हा दोघांचीही या वेळी सारखीच स्थिती होती. इतके महान पंडितजी माझ्यासारख्या अडाणी मुलीला आश्वासित करू शकले नाही.

. . . त्यातही अनेक देशांचे राजदूत येत होते. गीतापाठ सतत करणारात मीच मुख्य होते. भाईसाहेब, काका या सर्वांना तर व्यवस्थेसंबंधी सल्लामसलत करण्याकरिता सतत आतबाहेर करावे लागत होते. ज्यांना गीता येत होती आणि म्हणू शकत होते ते श्रद्धांजली म्हणून सूर पुरवत होते. पंडितजी एकाएकी परत आले. बापूंच्या पूर्ण शरीरावर हात फिरवला. म्हणाले, “मनू, और जोरसे गीतापाठ करो, शायद बापूजी जग जाय !” अशी होती आपल्या नेहरूंची भयंकर मनोव्यथा ! बापूजी आता राहिलेले नाहीत हे जणू काय त्यांच्या लक्षातच नसायचे आणि वारंवार येऊन ते बापूच्या शरीरावर हात फिरवून जायचे. बापूचा चेहरा आणि संपूर्ण शरीर इतके काही तेजस्वी वाटत होते की जणू काय त्यांना गाढ झोपच लागली होती ! अशी अपूर्व शांती होती.

आणि छायाचित्रकारांचे तर विचारायचेच काय? बापूजींचा देह गच्चीवर ठेवण्याकरिता वर नेण्यात आला. लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत सर्वांच्या डोळ्यातून जलधारा, हुंदके, प्रभुस्मरण, जयनाद याशिवाय दुसरे काहीही ऐकू येत नव्हते. लोक हात जोडायचे, ‘महात्मा गांधी की जय’ असे गगनभेदी आवाजात म्हणायचे आणि फुलांचा आणि पैशांचा तर क्षणोक्षणी वर्षाव व्हायचा. अशा प्रकारे जनता त्यांना अंतःकरणपूर्वक श्रद्धांजली वाहत होती. ते दृश्य अलौकिक होते. जणू काय बापूजींना जिवंत असताना जसे कळत होते तसेच आता मेल्यानंतरही कळते आहे. अनेक जातिजमातीचे, प्रांताचे लोक आपापल्या भाषेत प्रार्थना करत होते. अशा प्रकारे सर्वधर्मसमभावाच्या प्रार्थनेचा सूर सांभाळत होते.

रात्री दोन वाजता बापूजींच्या देहाला आंघोळ घालण्याकरिता न्यायचे होते. ही वेळसुद्धी इतकीच भयंकर होती. बापूंचे पार्थिव शरीर न्हाणीघरात आणले. एकेक करून कपडे काढले. बापूजींच्या ऑस्ट्रेलियन गरम लोकरी शालीलासुद्धा छिद्र पडले होते आणि गोळ्या लागल्यामुळे ती तीन ठिकाणी जळाली होती. धोतर तसेच चादर रक्ताने चिंब भिजले होते.

बापूजींचा देह फळीवर झोपवला.

लोही निगळते चरणे भाई,

एकलो धा . . . ने . . .रे.

(भाई, तुला रक्ताळलेल्या पायांनी एकट्यानेच चालायचे आहे रे . . .)

या कडव्याचे हे मूर्तिमंत दृश्य पाहून देवदास काका आणि आम्ही सर्व त्यांच्या जखमी देहाकडे पाहत होतो आणि हृदय फाटेल असे आक्रंदन करत होतो. असे असूनही त्या क्रूर विधात्याला काही दया आली नाही ! आमच्या हृदयभेदक आक्रंदनाने कोणाला कशाची दया येते? आम्ही पूर्ण पापी होतो ना? आणि असे असतानासुद्धा विधातादेवीच्या दयेची आम्ही अपेक्षा करत होतो ! कडाक्याची थंडी आणि बर्फासारखे थंड पाणी बापूजींच्या कोमल शरीरावर टाकायची कोण हिंमत करील? . . . हेसुद्धा अखेरीस मीच केले! बापूजींना न्हाऊ घातले. बापूजींचा देह असलेली फळी खोलीच्या मध्यभागी ठेवायला लावली. तिच्यावर खादीची पांढरी चादर  घातली. बापूंचा देह त्यावर झोपवला.

ज्या माळेने ते रोज रामनामाचा जप करायचे ती माळ मी त्यांच्या गळ्यात घातली. सुताच्या धाग्याच्या आधाराने स्वराज्य मिळवल्याचे प्रतीक म्हणून त्यांच्या गळ्यात सुताचा हार घातला. गळ्यावर आणि छातीवर चंदन लेप केला. कपाळावर कुंकूचा टिळा लावला. जणू काय हा टिळा अपूर्व विजयाच्या किती तरी गोष्टी सांगत होता. खोली गुलाबाच्या आणि इतर सुगंधित फुलांनी इतकी काही भरून गेली होती की जणू खाली फुलांचा गालीचाच अंथरला आहे असे वाटावे.

पाहतापाहता घड्याळात ३.३० चे टोले पडले. कान धरून मला उठवणारे बापूजींचे प्रेमळ हात आज नव्हते ! आज भाईसाहेबांनी उठवले. आता यापुढे ‘ब्रिजकिशन’ ही हाक ऐकू येणार नव्हती ! अखेरीस आम्ही सर्वांनी बापूजी ज्या ब्राह्म मुहूर्तावर प्रार्थना करत असत त्या मुहूर्तावर प्रार्थना केली. . आज आम्हांला हुकूम करणाऱ्या बापूंची ‘नम्यो’ ही हाक आम्हांला ऐकू येणार नाही.  बापूजींचा कोणताही प्रतिसाद येणार नाही ! आता ‘दो मिनिटकी शांति’ कोण म्हणणार आहे? असे म्हणणाराने तर आता पूर्ण शांती मिळवली आहे!

आणि ‘ईशावास्यम् सर्वम्‘ सुरू करून संपूर्ण प्रार्थना महामेहनतीने आम्ही पूर्ण केली. ‘कर ले सिंगार’ हे भजन आम्ही म्हणालो -

फिर वहाँसे नही आना होगा,
कर ले सिंगार चतुर अलबेली,
मिट्टी से मिल जाना होगा,
‘फिर वहांसे नहीं आना होगा ।

आणि 'फिर वहांसे नहीं आना होगा . . .' मधील बापूंच्या पवित्र, तेजस्वी चेहऱ्याचे दर्शन परत कधी होणार आहे? ते प्रेमळ डोळे, उफाळून येणारे वात्सल्य, ते मुक्त हास्य आता कुठे ! आगळ्यावेगळ्या निर्भयतेने भरलेली विशाल उघडी छाती ! आणि त्या चमचमणाऱ्या भव्य बापूंचे आता कधीही दर्शन होणार नाही काय? राग तर आसावरी आहे - परंतु भयंकर निराशा करणारा.

परत लोकांची असाधारण गर्दी होऊ लागल्यामुळे बापूजींचा देह परत वर नेण्यात आला. देशविदेशातील राजदूत आणि उच्चायुक्त, सरकारी नोकर, हिंदुस्थानच्याच नाही तर जगाच्या शांततेच्या सम्राटाचे दर्शन घेण्याकरिता पोहोचले होते.

शनिवारी ता. ३१ जानेवारीची प्रभात उगवली. उषःकालाचा उल्हास कुठेही नव्हता. मानवहृदयाचे हे आक्रंदन पाहू शकत नसल्यामुळे सूर्यदेवानेसुद्धा आपले तोंड ढगांनी झाकून टाकले होते. बापूंनी निरोप घेतल्यानंतर बारा बारा तास लोटले होते ! ते म्हणाले होते "है बहारे बाग दुनिया चंद रोज !" या चंद तासातच सर्व काही आवरून घेण्यात आले आहे. अहो, या संपूर्ण यज्ञाची मी साक्षी आहे, या काही दिवसांची मी साक्षी आहे. "मला अशांततेकडून शांततेकडे जायचे आहे" या शब्दांची मी साक्षी आहे! "कोणी गोळीने मारील तर सांगशील की हा खरा महात्मा आहे. परंतु रोगाने मेलो - अरे, लहानशा फोडाफुणशीने जर मी मेलो तर सागशील की हा महात्मा ढोंगी होता." या हकिगतीची साक्षी मी आहे. मी तर बापूजीपासून एक इंचही दूर नव्हते. माझ्याच बाजूने पिस्तुल घेऊन माझा देशबंधू आला होता ! आणि या पिस्तुलाच्या गोळ्याही माझ्या समोरच झाडण्यात आल्या होत्या ! माझ्या खांद्याच्या आधाराने बापूजी टेकलेले होते. आणि गोळी सुटली. कशी मी? आणि जगातील या दोन महात्म्यांच्या - पू. मोटी बा आणि पू. बापू - अंत्यविधीचीही मीच साक्षी ! आणि आज या जगात ज्या पद्धतीने मी जगते आहे तीही प्रभूची अनाकलनीय महिमा आहे !

आजच्या या अंत्ययात्रेत भाग घेण्याकरिता लाखोंचा जनसमुदाय मोठ्या पहाटेसच बिरला भवनजवळ आणि नवी दिल्ली स्थानकावर येऊन पोहोचला होता. देशभरात शोकदिवस पाळला जाणार आहे. संपूर्ण शहरात सर्व ठिकाणी राष्ट्रध्वच अर्ध्या उंचीवर फडकत होते. अल्बुकर्क रोड तर जनतेकरिता बंद करावा लागला होता. सरकारचा सक्त पहारा होता. लष्करात वापरतात तो रणगाडा बापूंना निरोप देण्याकरिता सजवण्यात आला होता. हे वाहन खूप उंच असल्यामुळे जनता बापूजींचे दर्शन घेऊ शकत होती. या वाहनाला भगव्या वस्त्राचे आच्छादन घालण्यात आले होते. बिरला भवनमध्ये शेवटपर्यंत जी लाकडाची फळी वापरली होती ती त्या रणगाड्यात ठेवण्यात आली होती, आणि तिच्यावर एक बसकी बाज ठेवण्यात आली. त्या बाजेवर

बापूंचा देह ठेवण्यात आला. ती खाटच उंच करायची योजना होती. ही सर्व व्यवस्था करण्याच्या दृष्टीने सरसेनापती जनरल बुशर यांच्या घरी बराच विचारविनिमय करण्यात आला होता.

बरोबर ११ वाजता त्या फळीसह बापूजींचा देह रणगाड्यावर चढवण्यात आला. दुधासारखी पांढऱ्याशुभ्र चादरीचे पांघरूण त्यांना घालण्यात आले. याच वेळी माझे वडीलसुद्धा महुवाहून येणार होते. ते येऊन पोहोचले. पण अजून बिरला भवनबाहेरही आम्ही निघालो नव्हतो तर कोणी तरी मला सांगितले की तुझे पिताजी आले आहेत ! मला वाटले की बापूंना माझ्याबद्दल अंतरिक्षातही काळजी असेल. याचमुळे त्यांनी मला बिरला भवनबाहेर पडण्याआधीच माझ्या वडिलांना सोपवले ! रामदासकाका नागपूरहून विमानाने आले. पंडितजींना अतिशय प्रिय असलेले गुलाबाचे फूल अंतिम श्रद्धांजली म्हणून त्यांनी ते बापूंना वाहिले. तेवढ्यात बिचाऱ्या सुशीलाबहेन आक्रंदन करत भागलपूरहून आल्या. आम्ही तिघी बापूच्या छातीवर डोके ठेवून अश्रूंची अंजली वाहत होतो. तरीही आज काही ते आमच्याशी बोलणार नव्हते. मी तर बापूजींची अंतःकरणापासून खूप खूप माफी मागितली, आणि एकच मागणी केली की हे बापू ! तुम्ही दिलेले भांडवल मी वाढवू शकते की नाही याची मला काळजी नाही, पण मी ते उधळणार नाही याचे तुम्ही मला सतत भान करून देत जा . . .

स्मशानयात्रेत लष्कराच्या तिन्ही विभागांचा - खुशकी, नौदल आणि वायुदल - समावेश होता. हवाईदलाची तुकडी येऊन पोहोचली होती. लाल डगलेवाल्या पोलिसांची तुकडीही हजर होती. चार रणगाडे या मिरवणुकीसमोर राहणार आहेत. माणसांच्या गर्दीला तर सुमारच नव्हता. बापूंच्या देहावर फुलांचा वर्षाव सुरू होता. पैशांचा तर ढीग गोळा झाला होता. आमच्या बिरला भवनच्या मुख्य प्रवेशदाराची खूप काळजी घेण्यात आली होती. अंजली अर्पण करायला येणारांकरिता पास काढणे आवश्यक करण्यात आले होते. लाखो माणसांचा हा समूह शोकसागरात बुडालेला होता.

आम्ही सर्वांनी बापूंना उचलले. माझ्या खांद्यावर - सोळा वर्षाच्या पोरीच्या खांद्यावर - बापूंची तिरडी होती ! मी भाग्यवान होते की दुर्दैवी? कोणाच्या मनात तर कल्पनाही येणार नाही की जगद्वंद्य बापूंच्या तिरडीला आज मी खांदा देणार आहे ! एकीकडे भयंकर हुंदक्याचे आवाज, दुसरीकडे रेडिओवर प्रसारण करणाराचे छाती चिरणारे शब्द ! इथे त्याचे काय वर्णन करू? ते शब्द जगभरात पोहोचत होते - “बापूचे कलेवर आता बाहेर आणण्यात आले आहे. इथे लाखो लोक गोळा झालेले आहेत. निःश्वाससुद्धा ऐकता येईल इतक्या शोकपूर्ण शांततेत भारताचे राष्ट्रपिता आज आपल्या अखेरच्या शांतियात्रेकरिता बिरला भवनचे दार ओलांडत आहेत. लाखो लोक इथे आहेत, पण त्यांच्यात जीव कुठे आहे ! प्राण तर तो होता जो आता आपल्या अखेरच्या

यात्रेकरिता निघाला आहे. जा, महात्माजी, जा ! तुमच्या अखेरच्या पवित्र मार्गावर जनहृदयाची अंजली घेत जा . . . करोडौंचा हा जनसमुदाय तुम्हांला, भारताच्या राष्ट्रपित्याला, विश्वाच्या युगपुरुषाला अखेरचे वंदन करतो आहे, जा महात्माजी !" . . .

रेडिओवर प्रसारण करणाराच्या शब्दांनी तर हृदयाचा बांध फुटून जात होता. मला पडितजींनी हात धरून खाली उतरवले. पंडितजींचे डोळे तर इतके सुजलेले होते की ज्यांनी त्यांचा प्रफुल्लित चेहरा पाहिलेला होता त्यांना तर त्यांची ही अवस्था पाहणेच जड होत होते. जनतेला मार्ग मोकळा करण्याची ते खाणाखुणांनी विनंती करत होते. तसेच एक लाऊडस्पिकरवाली मोटरसुद्धा जनतेला सूचना देत होती. लष्कराच्या तिन्ही विभागांच्या प्रतिनिधींनी दोरी ओढून प्रेतयात्रेला मार्ग मोकळा करून दिला आणि त्यांनी बापूंना - राष्ट्रपित्याला यमुनेच्या तटावर पोहोचवले, परंतु त्यांना तिथे पोहोचवण्याआधी तिथे त्यांच्या पाऊलखुणाचे चित्र काढले. आमच्याकडून जर पाच मैल पायी चालणे होत नसेल तर घरीच थांबा असे पूज्य मणिबहेन म्हणाल्या. परंतु हे कसे शक्य होते? सरदारदादा, रामदासकाका, मौलानासाहेब, कृपलानीजी वगैरे काही वेळा शववाहिनीवर बसत होते तर काही वेळा चालत होते. पंडितजीसुद्धा असेच करत होते. ध्वनिवर्धक असलेली एक मोटरसुद्धा लोकांना सूचना देत होती. लष्कराच्या तिन्ही विभागांचे प्रतिनिधी दोर ओढून या वाहनाला यमुनाकाठी पोहोचवणार होते. शववाहिनीवर सरदारदादा, रामदासकाका, मौलानासाहेब आणि कृपलानीची होते. हे सर्व केव्हा बसत होते तर केव्हा चालत होते. पंडितजीसुद्धा असेच करत होते. आम्ही पहिल्या तुकडीत रामधून म्हणत चालायला सुरुवात केली. आमच्यापुढे पोलीस होते. सर्वात पुढे चार रणगाडे होते. नंतर लष्करी तुकड्या, पोलीस तुकड्या, सेवादल, आणि शेवटी शववाहिनी. असा क्रम होता.

शववाहिनीमागे हिंदुस्थान सरकारचे मंत्री, महाराज्यपाल माऊंटबॅटनसाहेब, प्रांतांचे राज्यपाल, प्रांताचे मुख्यमंत्री, इतर मंत्री, उच्च लष्करी अंमलदार, विदेशांच्या राजदूत विभागाचे प्रतिनिधी, मित्र, स्वजन, बिरला कुटुंब, महाराज जामसाहेब तसेच इतर राजे, महासमितीचे तसेच लोकसभेचे सदस्य आणि दिल्लीचे पुढारी हे सर्व चालत होते.

४००० लष्करी सैनिक, १००० हवाई दलाचे सैनिक आणि १००० पोलिसांची तुकडी हे सर्व आपापल्या गणवेशात आले होते. चीनच्या राजदुताच्या आदेशाप्रमाणे दिल्लीत राहणारे सर्व चिनी लोकसुद्धा चिनी भाषेत 'गांधीजी अमर रहे' ही घोषणा आपल्या झेड्यावर विणून हजर झाले होते आणि शवयात्रेच्या मागेमागे चालत होते.

शवयात्रेची सुरुवात ११.३० वाजता झाली आणि पाचेक तासात पाच मैलांचे अंतर कापून ती राजघाटला पोहोचली. लोकांनी शंखनाद केला. कोणाच्या विजयासाठी हा शंखनाद होता? बापूच्या विजयासाठी? वा 'करू वा मरू' हे सूत्र सिद्ध झाल्याचा विजयाप्रित्यर्थ?

अंत्ययात्रेचा मार्ग असा होता - अल्बुकर्क रोड, किंग्जवे, मेमोरिअल आर्च, प्रिन्सेस पार्क, शाहजहान रोडवरून दिल्ली गेट. तिथून दर्यागंजजवळ राजघाट. 'महात्मा की जय', 'महात्मा गांधी अमर हो गये' या घोषणा आणि शंखनाद करत शवयात्रा मेमोरिअल मार्गावर पोहोचली. ती जेव्हा दीडशे फूट उंच युद्धस्मारकाजवळ पोहोचली तेव्हा मेमोरिअल आर्चच्या टोकापासून तर जवळपासच्या शेकडो वृक्षांवर, तारांच्या खांबांवर, घरांचे सज्जे, गच्च्या, जिथेकुठे नजर जाईल तिथे माणसेच माणसे दिसत होती. तिथे सर्व धर्माचे आणि जातिजमातीचे लोक होते. हजारो लोक हात जोडत असताना त्यांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत होत्या. बापूंना हात जोडून श्रद्धांजली वाहण्याकरिता, प्रणाम करण्यकरिता ते आतुरलेले होते. मध्येमध्ये पंडितजी, देवदासकाका आम्हा मुलींना आलटूनपालटून शववाहिननीवर बसवण्याकरिता घेऊन जायचे. आम्ही थकू नये म्हणून ते असे करत होते. मी रामधून संचालित करत असल्यामुळे अधूनमधून जाऊ शकत असे. रस्ता चांगला मोकळा राहावा म्हणून सायकलधारी गुरख्यांची तुकडी आणि स्काऊट रस्त्याच्या काठावरून चालत होते. पंडितजी मध्येच दोरावरून उडी मारून पलीकडे जायचे. त्यांची पोलिसांना आणि स्वयंसेवकांना फार भीती वाटत असे. त्यांच्या रक्षणाचीही त्यांच्यावर जबाबदारी होती. आणि जर कोणी त्यांना असे करू नका, धावपळ करू नका असे सांगितले तर ते खूप नाराज होऊन म्हणायचे, "अरे ! तुम तो बापू को तो न बचा सके."

संपूर्ण साडेपाच मैलांचा रस्ता गुलाबांच्या पाकळ्यांनी आणि पैशांनी भरगच्च आच्छादलेला होता. हिंदुस्थानी विमानदलाच्या तीन डाकोटा विमानांनी बापूजींच्या शववाहिनीला तीन प्रदक्षिणा घातल्या आणि शववाहिनीवर त्यांनी पुष्पवृष्टी केली. त्यावेळी रामायणातील पुष्पक विमानाचे दृश्य माझ्या दृष्टीसमोर तरळत होते. तीनदा असे झाले. तिन्हीदा अशा प्रकारे चकरा मारत ते विमान जेव्हा गुलाबाच्या अत्तरासह सुगंधित गुलाबपाकळ्यांचा वर्षाव करत होते तेव्हा ते दृश्य अद्भुत वाटत होते.

दिल्ली गेटपुढे पूर्ण शवयात्रा दर्यागंजच्या मार्गाने यमुनातटाकडे वळली. रस्त्यात जिल्हा तुरुंग लागला. तिथे बापूजी कैदी म्हणून राहिलेले होते. या तुरुंगाच्या प्रवेशदारासमोर तुरुंगाच्या चौकीदारांनी आणि वार्डरांनी तुरुंगाधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली लष्करी पद्धतीने राष्ट्रपित्याला सलामी दिली. तेव्हा पंडितजी शववाहिनीवरून उतरले होते. राजेंद्रबाबूजी तर सिलोनमध्ये होते. तिथून ते दुपारी दिल्लीला पोहोचले. मुंबईहूनसुद्धा दुपारी

अनेक पाहूणे दिल्लीला पोहोचले. यामुळे ते अर्ध्या वाटेवरच शवयात्रेत सामील झाले होते. दिल्लीगेटजवळ तर बेसुमार गर्दी होती. जवळपास तीन ते चार लाख लोक असतील. आजूबाजूच्या गावातूनसुद्धा लोक आले होते.

यमुनातटावर १२ फूट लांबीरुंदीचा आणि अडीच फूट उंचीचा एक चबुतरा तयार करण्यात आला होता. यमुनेच्या पाण्याने धुऊन तो पवित्र करण्यात आला. रस्ता पंच पल्वलाच्या पानांनी सजवण्यात आला होता. पंधरा मण चंदनाची लाकडे, चार मण तूप, एक मण श्रीफळ, एक मण समिधा, पंधरा पौंड कापूर, ही सर्व सामुग्री तिथे तयार होती. लोकांनी चितेच्या ठिकाणी प्रवेश करू नये म्हणून चितेच्या ठिकाणापासून शंभर गज अंतरावर एक मजबूत कुंपण घातले होते. इथेसुद्धा लाखो माणसे आधीच पोहोचली होती. हिवाळ्याचा थंड वारा कानात फुंकर घालत होता. आम्ही पोहोचलो तेव्हा तिथे भयंकर गर्दी झालेली होती. काही बेशुद्ध झाले होते, काहींना इजा झाली होती. ॲम्ब्युलन्स, गाड्या हजर होत्या. धावपळ करत होत्या. राष्ट्रपित्याचे दर्शन घेण्याचा प्रत्येक माणसाला सारखाच हक्क असल्याचे स्पष्टपणे जाणवत होते. आम्ही जेव्हा शवखाली उतरवण्याकरिता तयार झालो तेव्हा बापूजींचा संपूर्ण देह फुलांच्या ढिगाखाली झाकला गेलेला होता. दिसत होता केवळ असा एक भव्य चेहरा, की जो कधीही झुकला नव्हता, ज्याने अनुपम विजय मिळवले होते आणि ज्यावर आता चंदनाचा लेप लावलेला होता !

आम्ही सर्वांनी मिळून शववाहिनीवरून शव खाली उतरवला. पंडितजीसुद्धा हिंदू विधिनुसार केवळ धोतरच नेसून आले होते. अंत्यविधी करण्याचा सर्व त्यांना आग्रह करत होते, परंतु त्यानी रामदासकाकांचाच आग्रह कायम ठेवला होता. तिरडी खाली घेत असताना न चुकता त्यांनी आम्हा सर्वांना आठवणीने बोलावले.

अखेरीस आम्ही आमच्या पापी हातांनी बापूच्या देहाला यमुनामाईच्या पाण्याने आंघोळ घातली. उत्तर दिशेकडे त्यांचे डोके विधिपूर्वक श्लोक म्हणत चंदनाच्या काष्ठावर ठेवून त्यांना सन्मानपूर्वक निरोप दिला. शास्त्री रामधन शर्मा हा विधी करवून घेत होते. आम्ही सर्वधर्माची प्रार्थना केली. असा कोण निष्ठूर असेल की ज्याच्या हृदयाचा या वेळी थरकाप उडाला नसेल? अहो, बापूंच्या कोमल देहाला लहानसा काटा जरी रुतला तरी आमचे अंतःकरण कळवळत असे - त्या बापूंचा कोमल देह मोठाल्या लाकडांखाली ठेवायचा - अहो . . . हा सर्व दुःखद प्रसंगसुद्धा आम्हांला सहन करावा लागत होता. किती भयंकर ! मी तर सरदारदादांच्या मांडीवर डोके ठेवून खूप खूप रडले. पंडितजींच्या रडण्यालाही पारावार नव्हता. सरदारदादा आणि पंडितजी जणू काय एकाच दिवसात म्हातारे झाले होते. लॉर्ड माऊंटबॅटननी त्यांना शांत करण्याचा खूप प्रयत्न केला. लॉर्ड आणि

लेडी माऊंटबॅटन, त्यांच्या दोन्ही मुली, त्यांचे जावई, लॉर्ड ब्रेब्रॉन, मद्रासचे राज्यपाल सर आर्चिबाल्ड नाई, संयुक्त प्रांताच्या राज्यपाल श्रीमती नायडू, पूर्व पंजाबचे राज्यपाल चंदुलाल त्रिवेदी, खेर साहेब, राष्ट्रपती राजेंद्रबाबूजी, राजकुमारीबहेन वगैरे अनेक तिथे होतेच. एखाद्या प्रेमळ बहिणीने सांत्वन करावे तसे लेडी माऊंटबॅटन यांनी पंडितजींचे सांत्वन केले, परंतु त्यांना रडू आवरतच नव्हते.

अखेरीस ज्वाला मोठ्या होऊ लागल्या. वाऱ्यामुळे आगीच्या ठिणग्या उडत होत्या. अग्निदेव जूणू काय आमच्या पापांना धिक्कारत होता आणि म्हणूनच की काय जोराचा वारा वाहत होता. आगीत उडणाऱ्या ठिणग्यांचा वेग वाढतच चालला होता. आमची ही अवस्था पाहून जो ट्रक मिळाला तो घेऊन सरदारदादांनी आम्हांला बिरला भवनमध्ये पाठवून दिले. आमची काय हिंमत की आम्ही बापूंच्या खोलीत पाय ठेवू शकत होतो? संपूर्ण बिरला भवनात आमच्या मदतीला धावून येईल असा कोणीही नव्हता. खूप रडलो, खूप आकांत केला. अखेरीस अश्रूसुद्धा वाळून गेले. उशीरा रात्री कडाक्याच्या थंडीत एकदम थंड पाण्याने आंघोळ केली.

आम्हांला राजघाटवर शेटपर्यंत थांबायचे होते. परंतु तुफान गर्दी आणि आमची ही अवस्था पाहून सरदारदादांनी आम्हांला परत आणले होते. अखेरीस आमची चौकशी करायला प्रेमळ काकाकाकी आले. आमच्या इच्छेखातर काकां आपल्या गाडीतून आम्हांला चितास्थानावर घेऊन गेले. बापूजींचे जुने सहकारी दक्षिण आफ्रिकावाल्या सोराबजीभाईंचा तिथे सतत पहारा होता. आणि रात्रीतून तिथे तारेचे कुंपण घातले. तसेच तिथे सैनिकांचाही पहारा होता.

रात्री दोन वाजता आम्ही परत तिथे गेलो तर काय पाहिले?


इस तन धन की कौन बडाई,<br>
हाड जले जैसी लकडी की मौली;<br>
बाल जले जैसे घास की पोली !

कबीरजींचे हे भजन किती यथार्थ आहे, ते प्रत्यक्ष पाहणे मला शक्य होत नव्हते.

मी लगेच गाडीत चालले गेले. डोके भणभणू लागले. डोळ्यासमोर अंधार पसरला. काकांनी आम्हांला परत गाडीत आणले.

माझ्या वयाचे अजून दोन दशकेही पूर्ण झालेले नाहीत. आणि या दोन घटना ! पू. कस्तुरबा आणि महात्मा गांधीसारख्या  जगाच्या इतिहासात अमर झालेल्या व्यक्तींच्या अग्निदाहाची साक्षीदार मी एकटीच झाले ! आणि असे असतानाही जग मला भाग्यशाली पोरगी समजते. परंतु माझ्या अंतःकरणात तर हा असह्य आघात कायम राहील.

{माझ्या डायरीतील पाने.या डायरीतील काही पाने २ फेब्रुवारीला लिहिली आहेत.}



by Stella Brown

THE ASSASSINATION




આજ સે ૪૧ સાલ પહેલે – આજ હી કે દિન ૧૯૪૮ કી ૩૦ જનવરી શામકો જબ એક હત્યારાને પૂ. બાપૂ કે સીને પર ગોલીયાં ચલાઈ ઉસ વક્ત પૂ. બાપૂકે સાથ મૈં ઔર મનુ બહન ગાંધી બિરલા ભવન મેં પ્રાર્થના સ્થલ કી ઓર જા રહે થે। ઉસ સમય પૂ. બાપૂકા દાહિના હાથ મેરે કંધે પર થા। મૈં ઔર મનુ બહન પૂ. બાપૂકી ચલતી ફિરતી લકડીયાં થી। ઉસ દિન મેરે લિયે કમનસીબી કા થા, ઔર ખુશ નસીબી કા ભી કહ સકતે હૈં। ખુશ નસીબી ઇસલિયે કી ઉસ વક્ત પૂ. બાપૂકે પવિત્ર હાથોં કા આખરી સ્પર્શ મુઝે હુઆ થા। ઔર કમનસીબી ઇસલિયે કી મેરે નસીબ મેં લિખા હુઆ થા કી હમારે પ્યારે બાપૂકી હત્યા મેરે સામને હુઈ ઔર મૈં ચશ્મદીદ સાક્ષી બન ગઈ.

પૂ. બાપૂકી ઇસ શહીદીસે ન સિર્ફ મુઝે લેકિન સારી દુનિયા કે દેશોં કો ક્ષતિ હુઈ હૈ। લેકિન શહીદી કભી બેકાર નહીં જાતી હૈ। હમ દેખ રહે હૈં કી દુનિયા કે કરીબ હર ગુલામ રાષ્ટ્ર આજ આઝાદ હોતા ચલા હૈ - ખાસ કરકે આફ્રિકા કે દેશ જહાં ઇસ સદીકે પહલે દશક મેં પૂ. બાપૂને હી સત્યાગ્રહ કા પ્રયોગ શુરૂ કિયા થા। — પૂ. બાપૂ જિંદગીભર આઝાદી કે લિયે લડે ઔર દુનિયા કે હરેક રાષ્ટ્ર કો ગુલામી કી જંજીર સે મુક્ત પાને કી પ્રેરણા પૂ. બાપૂને હી દી। રાષ્ટ્ર કો સત્ય ઔર અહિંસા કે રાસ્તે પર ચલને કી રાહ દિખાઈ।

પૂ. બાપૂ આજ ભી જીંદા હૈં ઔર તબતક જિન્દા રહેંગે, જબ તક ઇતિહાસ રહેગા।

ભવદીયા
આભા ગાંધી

રાષ્ટ્રીયશાલા
રાજકોટ
૩૦.૧.૮૯.

અને ૫-૧૦ પ્રાર્થનામાં જવા નીકળ્યા. બાપુ કહે આજે
૧૦ મિ. મોડું થયું તે કેમ ~~...~~ ઘડીયાળ
ન બતાવી? લાલીએ કહ્યું બાપુ આપ એવી ગંભીર
વાતો કરતા હતા કે સરદાર ઘણા દહાડે આવ્યા છે તો
હું શું બોલું? એટલે મારી બોલવાની હિંમત ન ચાલી
બાપુએ કહ્યું નર્સોનો ધર્મ એ તો નથી વખતસર
કરવું તે કરવું. એ કહ્યું બાપુ આપે હમણા ઘડીયાળના
માન ઘટાડી દીધાં છે બાપુ કહે હવે તે ઈશ્વરનું
પણ ત્યાં શાનું કર્યું છે? પણ હમણા પ્રાર્થનાની માત્રા -
તૈયારી છે હવે આરામ બંધ પાણી નથી પીવું ત્યાંનું
શું? પેશાબ તો આવે છે ~~...~~ આ બધી વાતો
કરતા પગથીયાં તો ચડ્યા. બાપુએ અમારા ખભા
ઉપરથી હાથ લઈ લોકોને હાથ જોડ્યા. હું ડાબી
તરફ હતી લાલી જમણી તરફ હતી. બંને બાજુ લોકોની
હાર હતી. મારી તરફથી એક માણસ મિલટ્રીના કપડાં

પહેરેલ હાથ જોડતો માણસ આવ્યો મને થયું એ પગે લાગવા
આવે છે મેં એને રોકવા હાથ પકડ્યો મારો હાથ
એણે ઝટ છોડાવી દીધો અને હાથમાંની પીકદાનથી એન પછી
એક ગોળી છોડી આ શું? શું થઈ રહ્યું છે મારા હાથમાં
થી માળા પડી ગઈ થૂંકદાની પડી ગઈ ~~...~~ પોથીના હાથમાંથી
મેં ઝૂંટવી ત્યારે પહેલો ધડાકો થયો બાપુએ અમારા ખભા ઉપર
હાથ મુક્યો એકદમ આગળ આવ્યા બીજો ધડાકો
આવ્યો જે પેટમાં એક છાતીમાં ત્રીજી ગોળીએ ~~...~~ બાપુનું
માથું લાલીના હાથમાં પડ્યું પણ હાથમાંથી છટકી ગયું અને
બાપુ એકદમ નીચે પડી ગયા. તે વખતે બાપુના મોઢામાંથી
રામ રામ નીકળ્યું અને ~~...~~ પ્રાણ ઊડી ગયો! તે
વખતે હું અને લાલી બંને હતા. આ તરફ હત્યારો લાગી
છૂટવા લાગ્યો હતો એટલે અંદર આવી અને બાજુ જનતાએ પકડ્યો.

મનુબહેનની ડાયરીમાંથી



પૂજ્ય બાપુ

# २. पूज्य बा

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।

अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।

आर्यावर्ताचा इतिहासच असा आहे की प्रत्येक युगात काही ना काही महत्त्वपूर्ण घटना घडलेल्या आढळतात. वेदांत पाहिले तर अवतारांचा जन्म आणि अखेरीस असाच रहस्यपूर्ण अंत की जोपर्यंत पृथ्वीवर सूर्यचंद्र राहतील तोपर्यंत यांची नावे अमर राहतील. या सर्व घटना खरोखरच घडल्या असतील काय? आजच्या यंत्रयुगात असा प्रश्न कोणाच्याही मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे. परंतु याचे समर्थन आपण ज्या युगात जगतो त्या युगाने होते. हे युगसुद्धा तितकेच रहस्यमय आहे.

ज्याप्रमाणे बापूंच्या जीवनाचे एक अपूर्व दर्शन वाचकांना कदाचित झाले असेल तसेच बाच्या पवित्र जीवनाचे असेच अपूर्व दर्शन घडवून कृतार्थ होते आहे.

३० जानेवारी जितकी अद्भुत, पवित्र तसेच हृदयस्पर्शी तारीख आहे तशीच २२ फेब्रुवारीसुद्धा (हिंदू तिथीप्रमाणे महाशिवरात्र) तितकीच अद्भुत, पवित्र आणि हृदयस्पर्शी तारीख आहे. हिंदुस्थानकरिता तसेच संपूर्ण स्त्रीजगताकरिता पू. कस्तुरबांचे जीवन हे एक प्रेरणात्मक जीवन आहे. पूज्य कस्तुरबा येण्याच्या आधी स्त्रियांचे जीवन चार भिंतीत कोंडले गेलेले होते. कस्तुरबांनी स्त्रियांना परत जागे केले. आणि हिंदुस्थानातील स्त्रियांचे स्त्रीत्व परत जागृत होईल अशा प्रकारे त्यांनी स्त्रियांना प्रेरित केले. त्यांच्या जीवनाचे संपूर्ण दर्शन तर माझ्या आणि इतरांच्या बऱ्याच पुस्तकांमधून घडवण्यात आले आहे. त्याचे तर इथे वर्णन करत नाही. परंतु यांच्या जीवनाचा अखेरचा दिवससुद्धा इतका भव्य आहे की तो आपणा सर्वांकरिता प्रेरणादायक होऊन राहो अशा प्रार्थनेसह माझ्या डायरीतील ही पाने इथे अक्षरशः उद्धृत करते आहे.

महाशिवरात्र,

२२ - २ - १९४४

काल देवदासकाका येऊन गेले. परंतु आजचा दिवस भयंकर आहे. याची पूर्वकल्पना आधीच प्रत्येकाला आलेली होती. आज रात्री सर्वांना जागरण झाले होते. सकाळी मोटीबा सुशीलाबहेनच्या मांडीवर होत्या. बापूजी आपल्या दररोजच्या आहाराचे उष्मांक लिहीत होते. मी मोटीबाचे पाय चेपत होते. सकाळपासून

मोटीबा अस्वस्थ होत्या. भजन, गीतापाठ, धून तर सतत चालूच होते. आणि आता औषध घ्यायला त्याच नाही म्हणाल्या.

स्वच्छ करायचे लहान हातरुमाल खराब झाले होते. आमच्यापैकी कोणी नसला तर बापूजी खूप भावपूर्वक ते स्वतःच धुऊन टाकत असत. याप्रमाणे आदल्या रात्री रुमाल धुऊन बापूजींनी ते वाळू घातले होते. अशी सेवा करण्याचा अलभ्य लाभ जणू काय त्यांना परत कधीही मिळणार नव्हता ! एवढ्यात सुशीलाबहेनला बा म्हणाल्या, “मला बापूंच्या खोलीत घेऊन चल.” बापूजींपासून क्षणभरही दूर होण्याची मोटीबांना इच्छा नव्हती. बापूजींच्या खोलीतच त्यांची खाट होती. परंतु त्या भानावर नसल्याचे हे चिन्ह होते.

यामुळे सुशीलाबहेनने मला खुणेने समजावून सांगितले, “तू ऊठ आणि यांची चादर वगैरे साफ कर.”

तोच कटेलीसाहेब, आमचे तुरुंगाधिकारी, किती तरी कागद घेऊन आले. (हे कागद कशाविषयी होते हे मला आठवत नाही.) त्यावर बापूजी म्हणाले,

“चर्चिल मला मोठ्यात मोठा शत्रू समजतात. मला अथवा ज्यांच्यावर देशातील जनतेचा विश्वास आहे त्यांना तुरुंगात कोंडून ते देशाला दाबून ठेवू शकत नाहीत. जनतेने जर अंतःकरणापासून त्यांच्यावर विश्वास दाखवला असता तर मी आज जरी मेलो तरी माझे कार्य संपले असे समजून मेलो असतो. परंतु मला स्वराज्य मिळवण्यासाठी जगायचे तर आहेच. आणि त्याकरिताच मी जगायचा प्रयत्न करतो आहे. मी हे जे उष्मांक लिहायचा प्रयत्न करतो आहे तोसुद्धा माझ्या जगण्याच्या प्रयत्नाचा एक भागच आहे. यामुळे मी बाच्या आजाराचे सर्व काम सोडू शकतो, परंतु हे काम मी सोडू शकत नाही.”

असे म्हणून तोंड धुऊन बापूजी मोटीबाजवळ गेले. बापूजींनी विचारले, “मी फिरायला जाऊ?” मोटीबा नाही म्हणाल्या. दररोज मोटीबांना किती जरी त्रास असला तरी त्या बापूजींना फिरायला जाण्याकरिता त्या नाही म्हणतच नसत. आज नाही म्हणाल्या. कदाचित त्यांना पूर्वकल्पना असेल की आजचा दिवस शेवटचा आहे ! ते काहीही असले तरी आज मोटीबाला क्षणभरही बापूजींपासून दूर राहण्याची इच्छा नव्हती ही हकिगत होती.

बापूजी बाजवळ बसले. बाने बापूजींच्या मांडीवर डोके ठेवले. मोटीबाला थोडी शांती मिळाली. अर्ध्या तासानंतर परत बापूजींनी विचारले, “आता मी जाऊ?” परंतु परत नाही म्हणाल्या.

जवळपास दहा वाजता बापूजींना जायची परवानगी मिळाली. बापूजी म्हणाले, “अगदीच फिरलो नाही तर मी आजारी पडेन. यामुळे थोडेसे फिरणे आवश्यक आहे.“ दहा वाजता फिरायला गेले. फिरत असताना बापूजी म्हणाले, “बा आता फार थोड्या वेळेची पाहुणी आहे. मुश्किलीने . . . चोवीस तास काढील. यामुळे कोणाच्या मांडीवर ही अखेरची झोप घेते हे पाहावे लागेल.”

बापूजी पाचेक फेऱ्या मारून वर आले. डॉ. गिल्डरसाहेब दर पाच पाच मिनिटांनी येऊन पाहून जायचे. सुशीलाबहेनसुद्धा सतत मोटीबाजवळच होत्या. बापूजींनी आंघोळ वगैरे लवकर उरकवून टाकली. गेल्या दोन दिवसांपासून जागरण होत असल्यामुळे बापूजी जे वाटलेले पाच बदाम घेत होते तेही त्यांनी बंद केले. बदाप वाटण्यात माझा वेळ जातो, आणि संपूर्ण खायचे तर बापूजींचा वेळ जातो. आणि बाच्या सेवेत उणीव निर्माण होते असा विचार बापूजींच्या मनात होता. मी बापूजींना विचारले, “आजही बदाम, काजू घेणार नाही काय?” बापूजी म्हणाले, “एक तर बा पूर्णपणे चांगली होईल तेव्हा घेईन वा ती रामजींच्या घरी गेल्यानंतर घेईन. चावायला वेळ दिलाच पाहिजे. खाल्ले नाही तर काही नुकसान नाही. परंतु अर्धवट चावून जर पोटात गेले तर मला अंथरुणच धरावे लागेल.” यामुळे वाफाळलेली भाजी वाटून तिच्यात दूध टाकून मी ती बापूजींना दिली. बापूजी तीच प्याले.

बापूजी साडेबारा वाजता परत मोटीबाजवळ गेले. मोटीबा कोणत्याही क्षणी जाऊ शकते असे वाटू लागले होते. पलंगाच्या चोहोबाजूला जवळपास संपूर्ण कुटुंब होते. माझे वडील होते. त्यांच्याजवळ मोटीबाने माझी प्रशंसा केली. बापूजींना आराम करायला सांगितले. मला बापूजींच्या पायांना तूप चोळायला सांगितले.

साडेतीन वाजता देवदासकाका गंगाजळ आणि तुळशीची पाने घेऊन आले. ते प्यायला मोटीबांनी तोंड उघडले. देवदासने थोडेसे पाजले. बा सतत कोणाची ना कोणाची माफी मागत होत्या. मोटीबा म्हणाल्या, “माझ्यामागे रडायचे नाही. हे देवा, मला माफ कर. तुझी भक्ती करायची संधी दे.”

बापूजींच्या बाटलीत थोडा गूळ राहिला होता. त्याकडे मोटीबाचे लक्ष गेले. पाचेक वाजता मला म्हणाल्या, “बापूजींचा गूळ तर संपत आहे. तो केला?”

मी म्हणाले, “हो मोटीबा, गूळ शेगडीवरच आहे. आणि आता लवकरच तयार होईल.”

जीवनभर त्या बापूजींची सेवा करत होत्या आणि प्रामुख्याने बापूजींच्या दोन्ही वेळेच्या जेवणाकडे त्या बारकाईने लक्ष देत होत्या. या गोष्टीकडे त्यांनी कधीही दुर्लक्ष केले नव्हते. आज शेवटच्या दिवशीसुद्धा त्यांना

ही काळजी असल्याचे हे प्रत्यक्ष उदाहरण होते. एकीकडे शारीरिक वेदनांशी संघर्ष सुरू होता तर दुसरीकडे अशा असह्य वेदनांमध्येही मला म्हणाल्या, "गूळ संपत आला आहे. जयप्रकाश इथेच आहे. तो माझ्याजवळ बसेल, तू जा." इतके शब्द फार मुश्किलीने म्हणाल्या. बोलायचा खूपच त्रास होत होता. शेवटचे काही पळ होते. अशातही हृदयात बापूजींची काळजी होती. मी स्वयंपाकघरात गेले. गूळ तयार केला तेव्हा कुठे बाना शांती मिळाली. गूळ तयार झाल्यानंतर त्यातील कचरा काढण्याकरिता तो परत पाण्यात टाकला.

त्यानंतर तो थंड करण्याकरिता परत पाण्यात टाकला. त्यात थोडे दूध टाकावे लागते. आणि मग त्याचा गुळाप्रमाणे गोळा तयार करायचा. शक्ती यावी म्हणून बापूजी दररोज एक तोळा गूळ घेत असत.

सायंकाळचे जेवण सामान्यपणे ५.३० वाजता होत असे. काही लोकांना शिवरात्रीचा उपवास होता. त्यांची व्यवस्था करायला मी थांबले आणि सर्व आटोपले.

प्रभावतीबहेन पूज्य मोटीबाजवळच होत्या. मोटीबा एकाएकी म्हणाल्या, "बापूजी !" मी पळत गेले. बापूजींना म्हणाले "तुम्हाला बोलावले आहे." बापूजी आले. दुसऱ्या दारातून मोटीबाचे एकुलते एक भाऊ माधवदासमामांनी प्रवेश केला. त्यांच्याकडे एक नजर टाकली. परंतु क्षणात विसरल्या आणि त्यांनी बापूजींच्या मांडीवर डोके ठेवले.

बापूजी मोटीबाच्या डोक्यावर हळूच हात फिरवत होते. मोटीबा म्हणाल्या, "आता मी जाते आहे. माझ्या मागे कोणीही रडू नका. आता मी शांत आहे." त्या इतके बोलत नाही तोच त्यांचा श्वास अवरुद्ध झाला. आम्ही सर्व त्याच्या खाटेजवळ उभे राहून रामधून चालवत होतो. रामनामाचे शेवटचे शब्द संपतात न संपतात तोच मोटीबाने बापूजींच्या मांडीवर मान टाकली आणि या जगाचा कायमचा निरोप घेतला !बापूजींच्या डोळ्यातून अश्रूचे दोन थेब पडलेच.

हे दृश्य इतके करुण आणि पवित्र होते की त्याचे शब्दांत वर्णन करता येणे अशक्य आहे. साठसाठ वर्षांचे वैवाहिक जीवन, इतकी निष्ठा आणि गृहस्थाश्रम धर्माचे अपूर्व आणि अजोड महिम्याचा जणू काय हा असा उपसंहार होता की ज्याच्या पावनकारी काव्यमय वर्णनाने आपणही सच्चरित्र होतो !

बापूजी सकाळपासून सतत म्हणत होते की असा कोण भाग्यशाली असेल की ज्याच्या मांडीवर मोटीबा जाईल? आणि बापूजींचीसुद्धा कसोटी होती. ते फिरायला निघत होते. शिवाय देवदासकाका इंजेक्यशन देण्यासंबंधीची बाजू मांडत होते. परंतु बापूजींना तर इंजेक्शन देऊन दोन तास जगवण्याऐवजी

रामनाम घेत रामजींच्या मांडीवर त्यांनी जाण्यात आत्मसमाधान वाटत होते. शक्य आहे की इंजेक्शनने जीवनाची दोरी एकदोन तासाने लांबली असती. परंतु आता त्यांना वेदना सहन करायला लावायची बापूजींना इच्छा नव्हती. या दरम्यानच बाने बापूजींना बोलावले.

अशा प्रसंगी आमच्यापैकी कोणामध्येही इतकी हिंमत कशी राहील ! हा क्षण इतका दुःखद होता. महाशिवरात्रीची ७.३५ ची ही वेळ होती. मंदिरातील आरतीचा गुंजारव सुरू असावा. अशा वेळी इश्वर आम्हा सर्व सर्वांना तसेच रडत सोडून मोटीबाला घेऊन गेला.

पाचेक मिनिटांनंतर बापूजीं उठले. सगळ्यांना धीर दिला. आम्ही मोटीबाचा देह न्हाणीघरात घेऊन गेलो आणि त्यांना आंघोळ घातली.

१९४२ साली बापूजींच्या हाताने कातलेल्या सुताची एक साडी त्यांनी मला जपून ठेवण्याकरिता दिली होती. मृत्यूनंतर अग्निदेवाचाला त्यांना स्वाधीन करत असताना ती त्यांच्या अंगावर टाकावी अशी इच्छा त्यांनी दर्शविली होती. त्या म्हणाल्या होत्या, “तू ही साडी जपून ठेव. मला ही सांडी नेसून जळायचे आहे”.अशी होती त्यांची बापूजींबद्दलची भक्ती.

माझे वय तर त्या वेळी बारातेरा वर्षांचे. परंतु अशी मूल्यवान साडी आश्रमवासीयांचा इतका मोठा समुदाय असताना त्यांनी मला सोपवली यात निश्चितच काही संकेत असेल. मी तर नागपूरच्या तुरुंगात होते. पू. बाच्या मागणीमुळे माझी बदली १९४३च्या मार्च महिन्यात आगाखान महालात झाली होती. आणि लगेच ही साडी मी जिथे ठेवली होती तिथून बोलावून घेतली. हा चमत्कार नाही तर दुसरे काय आहे? आणि मी ही साडी माझ्या थरथरत्या हातांनी त्यांच्या अंगावर पांघरूण म्हणून टाकली होती. “मला ही साडी नेसून मरायचे आहे” ही हकिगत मी कानांनी ऐकली होती आणि आता या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहत होते.

नंतर मृत देहाला जिथे झोपवायचे होते ती जागा गोमुत्राने पवित्र केली. पूज्य मोटीबाच्या हातातील बांगड्या काढून बापूजींच्या हाताने कातलेल्या सूताच्या धागे त्यांच्या मनगटाला बांधले. तुळशीची कंठीसुद्धा मी बदलवली. या प्रसादासारख्या त्यांच्या दोन्ही आठवणी (वर्षांपूर्वीच्या त्यांच्या हस्तिदंती बांगड्या) बापूजींनी मला दिल्या होत्या. त्यांना लाल काठाची पांढरी साडी गंगाजळात धुऊन त्यांना नेसवली. प्रेमलीलाबेनने पाठवलेली साडीही त्यांच्या अंगावर टाकली. कपाळावर चंदनाचा आणि कुंकवाचा लेप केला. शवाजवळ तुपाचा दिवा आणि ऊदबत्ती लावली. साक्षात जगदंबा असल्याप्रमाणे त्यांच्या चेहऱ्यावर तेज झळकत होते.

डोक्याकडील भागावर गुलाबाच्या फुलांनी ॐ केला आणि पायांच्या बाजूने स्वस्तिक. धूपदीप. मंत्रोच्चाराच्या उच्चारणाने वातावर पवित्र झाले होते.

केस मोकळे ठेवले. चेहरा शांत आणि तेजस्वी वाटत होता. साक्षा जगदंबा असावी तसे अपूर्व आगळेवेगळे तेज झळकत होते.

महादेवकाकांच्या समाधीस्थळाजवळच अत्येष्टी होणार होती. गोरमहाराज सर्व तयारी करवून घेत होते. मृतदेहाच्या पोटावर शिदोरी बांधायला लावली. त्यात जव, तेल, नारळ आणि सौभाग्यचिन्ह म्हणून पाच काचेच्या ठेवायची सूचना मला एका महाराष्ट्रीय भगिनीने केली होती. हा विधी केला.

पाच तास चिता जळत होती. आम्ही सर्व चितेजवळून क्षणभरसुद्धा हाललो नाही. थकव्यामुळे बापूजींना आत जाण्याची विनंती करण्यात आली. त्यावर बापूजी म्हणाले, "आता तर आरामच करायचा आहे ना? बासट बासट वर्षांचे सुखदुःखाचे आम्ही साथीदार ! आता या शेवटच्या घडीला जर मी चालली गेलो तर बा मला कधीही माफ करणार नाही.!"

२४ फेब्रुवारीला जेव्हा आम्ही अस्थी आणि फूल गोळा करू लागलो तेव्हा त्या हिरव्या काचेच्या बांगड्या जशाच्या तशा चकाकत असलेल्या दिसल्या. त्या अविच्छिन्न होत्या. आणि नवल हे की त्यांतीलच एक बांगडी मी शेगडीत टाकली तर ती कडकड आवाज करत ताबडतोब फुटली. आज या अखंड बांगडीचा प्रसादसुद्धा माझ्याजवळ आहे.

परंतु त्यांचे सौभाग्यसुद्धा असेच होते ना! हिंदुस्थान हा एक भाग्यवान देश आहे. या भूमीत आदर्श सती निर्माण होत असतात. त्यांच्या पुण्यमय तपश्चर्येमुळे आपली संस्कृती अजूनही कायम राहिली आहे. आपल्या देशाला त्याचा अभिमान वाटतो. पूजनीय बाची तुलना जर रामायणातील पात्रांशी करायची असेल तर बा साक्षात सीतामाता होत्या. ज्याप्रमाणे रामाचे दुःख सीताजींनी स्वतःचेच दुःख मानले त्याचप्रमाणे बाने बापूजींचे दुःख स्वतःचे दुःख मानले. सत्यवचनी रामामागे सीताजी ज्याप्रमाणे वनात गेल्या त्याचप्रमाणे बासुद्धा देशाला गुलामगिरीतून सोडवण्याकरिता वनात गेल्या आणि सर्व सुखांचा त्याग केला.

पतीच्या पावलावर पाऊल टाकून चालायची जी पद्धत पुरातन काळापासून पडली आहे तसेच मोटीबानेसुद्धा बापूजींच्या सुधारणा स्वीकारून पतिपरायण पत्नीचे आदर्श जीवन जगून दाखवले. पू. मोटीबाचे

पालनपोषण जरी जुन्या पद्धतीने झाले होते तरी वर्तमानकाळाशी त्या चांगल्या परिचित होत्या. आधुनिकतेचे तत्त्व त्यांनी विवेकपूर्ण पद्धतीने पचवले होते.

त्या स्वतः आदर्श वैष्णव होत्या. वैष्णवाचे चिन्ह म्हणून त्यांनी गळ्यात माळ घातलेली होती. असे असूनही त्यांनी आपल्या मनातील स्पृश्यास्पृश्यतेची भावना काढून टाकली होती. हरिजन मुलीला पुत्री म्हणून दत्तक घेतले. सर्वांचा स्वीकार केला.

पू. मोटीबा पतिभक्तीच्या पराकाष्ठेला जरी पोहोचल्या होत्या तरी त्यांची पतिभक्ती आंधळी पतिभक्ती नव्हती. आवश्यकता वाटली तर बापूजींना धमकावण्यातही चुकत नव्हत्या.

प्राचीन काळातील ऋषीपत्न्या एक तर ईश्वर प्राप्तीकरिता तपश्चर्या करत असत वा पती वनात गेला तर त्याच्यामागे तपश्चर्याकरत असत. परंतु ही ऋषिपत्नी आपल्या गुलाम देशाला स्वतंत्र करण्याकरिता, ४० कोटी आत्म्यांना मुक्त करण्याकरिता तप करत होती आणि इतरांची सेवा करण्याकरिता आपले सर्वस्व अर्पत होती. बापूजींनीसुद्धा मोटीबांची काही कमी परीक्षा घेतली नव्हती. परंतु ही महान सती आपल्या आत्मबलाने निष्कलंकपणे उजळून निघाली.

यांचे अखेरचे जीवनसुद्धा कसे गेले? किती पवित्र जागेवर यांचा अंत्यसंस्कार झाला? कोणत्या पवित्र कोपऱ्यात यांनी ईश्वरी वातावरणात अखेरचा श्वास घेतला? यांची ही तपश्चर्या वनातच होती. त्यांनी अशा वनात चिरंतन झोपायचे ठरवले. कारण? अजून देश गुलाम होता.

बा सगळ्यांच्या बा होत्या. त्या मुले, तरुण, स्त्री, पुरुष सर्वांच्या बा झाल्या. आणि अखेरीस बापूजींच्याही बा झाल्या. बापूच्या पुढील उद्गातून याची साक्ष मिळते - “मी जो इतका उंच चढलो आहे तो बाच्या प्रतापामुळे. . . .” बा कितीदा तरी बापूजींच्या गुरू व्हायच्या असे म्हटले तरी चालेल.

अशा होत्या आपल्या बा. हिंदुस्थानच्या भगिनी तर ठीक, परंतु संपूर्ण स्त्रीजगताकरिता एक भव्य आणि अमर वारसा त्या ठेवून गेल्या आहेत.

अशा वारशाला उज्ज्वल ठेवायची जबाबदारी हिंदुस्थानच्या भगिनींवर आहे.

प्रभूला प्रार्थू या की हे ऋण फेडण्याची त्याने आपल्याला शक्ती द्यावी.

* * * * *



દેવદાસ કાકા સાથે આ વાત પૂરી કરી
ઈસ્યા સ્નાની તૈયારીમાં હતા. બા બાપુના
ખોળામાં હતાં. શ્વાસ લેવામાં મુશ્કેલી લાગતી
હતી. તેમણે આખો બાપુ! એમ કહ્યું
એટલે ભાઈએ બાપુજીને બોલાવ્યા. બાપુજી
એ આવીને મોટીબાને પોતાના ખોળામાં લઈ
લીધા અને પૂછ્યું કે શું થાય છે? બાએ
કહ્યું "ખબર નથી પડતી. કાંઈક થાય છે"
આમાં આયંત કરગતા હતી. આંખ ફેર
ચડી જતી હતી. બધા રામધૂન ~~ના~~ ગાતા હતા.
હું પણ છોડીને પરોવી ગઈ રામધૂન સાંભળતાં (રામ રામ રામ રામ સીતા રામ રામ રામ.)
સાંભળતાં અને બાપુએ આંખ બંધ કરી બાના
માથા ઉપર માથું મૂક્યું આશીર્વાદ આપે
છેલ્લો ટીયા અને આખા જીવન સાથે રહ્યા
પછી છેલ્લી વિદાય અને માફી માંગતા
હોય એમ દૃશ્ય અત્યંત હૃદયદ્રાવક અને
કરુણ હતું. નાડી બંધ થઈ છેલ્લો શ્વાસ લીધો
આરતી આસતી પહેલા શમી. ત્યાં એમ બધા હતાં
બધાના આંખમાં આંસુઓ હતાં. દે. કાકા
પોકપોક મોઢું મૂકીને રડતાં હતાં. બે ત્રણવાર
બા બા કરીને બોલાવવા પ્રયત્ન કરી રહ્યાં હતાં
પણ બા તો ક્યારનાય પોતાના ધામમાં પહોંચી
ગયાં હતાં. છેલ્લો શ્વાસ 7-35 ~~ના~~ સાંજના હતો

મનુબહેનની ડાયરીમાંથી





મહાદેવભાઈ દેસાઈ અને કસ્તૂરબાની સમાધિ

* * * * *